
अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम.

द्वारा संचालित

श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि.वाशिम.



# अमरवाणी

## २०१७-१८

Scanned with OKEN Scanner

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरूळपीर, जि वाशिम.
द्वारा संचालित
श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य
महाविद्यालय, मंगरूळपीर, जि वाशिम.




# अमरवाणी

## २०१७-१८



Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्राचे थोर नेते




## श्री.वसंतरावजी नाईक साहेब

Scanned with OKEN Scanner

# आमचे भाग्य विधाता

## संस्थापक




## दानशूर श्री.अमरसिंग हरिचंद नाईक

आसोला खुर्द, ता.मानोरा, जि.वाशिम.



Scanned with OKEN Scanner



मा. श्री. आत्माराम अमरसिंग राठोड

# - संपादकीय -

संपादकीय......

'अमरवाणी' चा तिसरा वार्षिकांक वाचकाच्या हाती संपूर्द करतांना अत्यानंद होत आहे. विद्यार्थी, विद्यार्थीनीच्या युवा लेखनातून साकार झालेले साहित्य रस वैविधाने मन चिंब झाल्याची जाणीव झाली. या युवा लेखकांनी त्यांच्या लेखनीद्वारे वाङ्:मयाच्या विविध रुपांना त्यात असलेली विविधता, कलात्मकता व रसभाव अशा सर्वांगीन हा 'अमरवाणी' फुलविला आहे.

'अमरवाणी' साठी नव्या उमेदीने लिहणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्तपणे प्रतिसाद लाभला महाविद्यालयात विविध उपक्रम राववित असतांना विद्यार्थ्यांच्या अंगभूत सुप्त गुणांना वाव मिळतो चर्चासत्र, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, शारिरीक शिक्षण, रासेयो व विविध बहुरंगी कार्यक्रमाच्या माध्यमातून गुणांकंन करण्यांचा प्रयत्न 'अमरवाणी' ने केला आहे.

या वार्षिकांकासाठी विविधांगी असे बरेच साहित्य जमले, तरी अंकाच्या पानांची मर्यादा लक्षात घेता सगळेच लेख प्रकाशित करणे शक्य नव्हते, आम्ही त्याबद्दल दिलगीर आहोत.

महाविद्यालयाच्या विकासासाठी जिज्ञाशू वृत्तीने प्रयत्न करणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ.राठोड साहेब यांच्या मार्गदर्शनाने तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रत्यक्ष सहभागाने महाविद्यालयाची यशस्वीतेकडे वाटचाल सुरु आहे.

आपला

प्रा.डॉ.एस.ए.राठोड

टिप :- 'अमरवाणी' वार्षिकांक मधील लेख व कवितेतून व्यक्त झालेली मते सबंधिताची आहे.



Scanned with OKEN Scanner

# * मनोगत *

मनोगत...

मंगरूळपीर सारख्या ग्रामीण भागात अमर शिक्षण प्रसारक संस्थेने सन १९७१–७२ साली श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामुळे बऱ्याचअंशी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा मार्ग सुकर झाला व शिक्षणात लक्षणिय वाढ झाली. या महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी अगदी स्थापनेपासूनच या संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ.राठोड साहेब यांचे कर्तत्व अग्रगण्य आहे. त्यांनी महाविद्यालयाच्या इमारतीच्या स्थापत्या पासून ते वसाहतीतील प्रत्येक व्यक्तीच्या सुख दु:खाशी तन्मय होण्यापर्यंत अनेक लहान मोठया बाबतीत जिवापाड मेहनत घेतली आणि महाविद्यालयास एक विशिष्ट वळण दिले, आकार आणला व प्रतिष्ठा मिळवून दिली.

शिक्षणाचा पवित्र वसा घेतलेल श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय हे आज मंगरुळपीरच्या शहराच्या मध्यभागी असून बस्थानकाच्या अगदी जवळ आहे. महाविद्यालयचा परिसर अतिशय देखना असून सर्वत्र वृक्षराजीनी बहरलेला आहे.

महाविद्यालयात विविध प्रकारचे कार्यक्रम सातत्याने होत असतात रासेयोचे १०० विद्यार्थाचे पथक असून दरवर्षी वैशिष्टयपूर्ण शिबिर महाविद्यालयाच्या वतीने घेण्यांत येते थोर मोठयांच्या जयंत्या, पुण्यतिथीचा कार्यक्रम व इतरही प्रासंगीक कार्यक्रम होत असतात त्यामुळे संस्कृती संवर्धन होण्यांस मदत होते. महाविद्यालयात स्वतंत्र संगणक कक्ष असून विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होतो.

श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय ज्या उत्कट ध्यासातून जन्माला आले ते स्वप्न आमचे विद्यार्थी समाजाच्या विविध स्तरावर जावून साकार करीत आहेत, महाविद्यालय लोकभिमुख कसे होईल व उत्तरोत्तर महाविद्यालयाची प्रगती कशी होईल. यावर संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ.राठोड साहेब यांचे लक्ष केंद्रीत आहे. संस्थेचे संचालक मंडळ, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हया सर्वांच्या सहकार्याने हा महाविद्यालयरुपी शैक्षणिक रथ गतीने घोडदौड करीत राहिल, असा आशावाद वाटतो.

कार्यकारी प्राचार्य
डॉ.एस.ए.राठोड



Scanned with OKEN Scanner

वार्षिकांक

# ※ अनुक्रमणिका ※

## लेख (विद्यार्थी)


१) रम्य ते बालपण — कु सायली विजय अर्धापूरकर, ११ वा वाणिज्य

२) वृक्षवल्ली आम्हा सोयरे — कु सायली विजय अर्धापूरकर, ११ वा वाणिज्य

३) आई व बाबा — कु कविता मारोतराव कंठाळे, ११ वा वाणिज्य

४) अंधश्रध्दा एक शाप — कु कविता मारोतराव कंठाळे, ११ वा वाणिज्य

५) स्त्रीभ्रूण हत्या — कु विजया संजय मनवर, ११ वा वाणिज्य

६) संताची शिकवण — कु विजया संजय मनवर, ११ वा वाणिज्य

७) सहकाराची गरज — कु जयश्री रुपेश रणबावळे, ११ वा वाणिज्य

८) आजचा युवक / आजची युवापिढी — अंकुश दादाराव डोके, बी.ए.भाग— २

९) वेळ कुठे आहे — पृथ्वीराज सुनिल पवार, बी.ए.भाग— २

१०) शिक्षक कसा असावा — चंद्रशेखर श्रीकृष्ण खडसे, बी.ए.भाग— २

११) मुलगा किंवा मुलगी जगतांना — कु राखी अशोक निचळ, बी.कॉम.भाग— १

१२) सादरीकरण एक जिवनावश्यक कौसल्य — अमित सुभाष चव्हाण, बी.कॉम.भाग— १

१३) स्पर्धा परीक्षा एक आव्हान — कु रुपाली गोवर्धन तायडे, बी.ए.भाग— ३


---

## ※ कविता ※

## (विद्यार्थी)


१४) मुलाला जन्म देण्या अगोदर — कु संजीवनी विजय राउत, १२ वी कला

१५) आमचे सर — कु जयश्री रुपेश रणबावळे, ११ वी वाणिज्य

१६) अदृश्य बाबा — कु जयश्री रुपेश रणबावळे, ११ वी वाणिज्य

१७) माझी आई — कु जयश्री रुपेश रणबावळे, ११ वी वाणिज्य

१८) आई — कु विजया संजय मनवर, ११ वी कला

१९) आमचे बाबा — कु विजया संजय मनवर, ११ वी कला

२०) हुंडा — कु गायत्री विनोद राउत, १२ वी कला

२१) वनातले पक्षी — कु शिंपल विनोद राठोड, १२ वी कला

२२) बाप — कु वैष्णवी राजेश लुंगे, बी.कॉम.भाग— १

२३) कन्यादान — कु वैष्णवी अ. थोरबोले, बी.कॉम.भाग— १

२४) जीवन असे जगावे — कु वैष्णवी अ. थोरबोले, बी.कॉम.भाग— १

२५) मोहक पावसाळा — कु वैष्णवी अ. थोरबोले, बी.कॉम.भाग— १




Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| २६) आव्हान | — | कु.वैष्णवी अ. थोरबोले, बी.कॉम.भाग– १ |
| २७) व्यसनाचे बळी समाज | — | अमित सुभाष चव्हाण, बी.कॉम.भाग– १ |
| २८) शेतकऱ्याची गती | — | अमित सुभाष चव्हाण, बी.कॉम.भाग– १ |
| २९) पण.. | — | अमित सुभाष चव्हाण, बी.कॉम.भाग– १ |
| ३०) पावसाळयात भिजणारी भेट | — | अमित सुभाष चव्हाण, बी.कॉम.भाग– १ |
| ३१) उघडली माझी शाळा | — | अमित सुभाष चव्हाण, बी.कॉम.भाग– १ |
| ३२) कसे सांगू | — | विशाल मनोहर छेंगाळे, बी.ए.भाग– ३ |
| ३३) वेळेचे महत्व | — | कु स्नेहा शामराव राउत, ११ वा वाणिज्य |
| ३४) जीत | — | कु रुपाली गोवर्धन तायडे, बी.ए.भाग– ३ |
| ३५) नगर का सेवक | — | कु रुपाली गोवर्धन तायडे, बी.ए.भाग– ३ |
| ३६) काय सांगू तू माझ्यासाठी काय होतास? | — | कु दिक्षा निरंजन भालेराव बी.कॉम.भाग– १ |
| ३७) का?कोणसाठी | — | कु दिक्षा निरंजन भालेराव बी.कॉम.भाग– १ |
| ३८) मराठी मुलगी | — | कु मयुरी वसंतराव खोडके, बी.कॉम.भाग– १ |
| ३९) गुजरे हुये पल | — | कु मयुरी वसंतराव खोडके, बी.कॉम.भाग– १ |

## ✲ लेख शिक्षक ✲

| | | |
|---|---|---|
| ४०) मराठी भाषेचे जिवनातील स्थान | — | प्रा.एस.बी.चव्हाण |
| ४१) कॅशलेस व्यवहार | — | प्रा.डी.बी.जाधव |
| ४२) भारत स्मार्ट च्या दिशेने | — | प्रा.डी.बी.जाधव |
| ४३) सहकारातून समृध्दीकडे | — | प्रा.व्ही.डी.कोवे |
| ४४) VALUE OF TIME AND YOUTH | — | प्रा.पी.एन.जाधव |
| ४५) मॉल संस्कृतीचे किरकोळ व्यापारावर होणारे परिणाम | — | प्रा.ए.एन.गजभिये |
| ४६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्व व समकालीन दलित्तोध्दाराचे कार्य एक विवेचन | — | प्रा.सी.एन.घुगे |
| ४७) संत तुकारामाच्या साहित्यातील समाजिकता | — | प्रा.डॉ.एस.ए.राठोड |



Scanned with OKEN Scanner

# ✻ रम्य ते बालपण ✻

'बालपण' हे आपल्याला प्रत्येकाला सहजपणे लाभते पण त्या निरागस अवस्थेत आपण फक्त एकाच विचाराने तळमळत असतो आणि तो विचार म्हणजे आपण मोठे कधी होणार? आणि आता मोठे झाल्यावर सारखी आठवण येते त्या बालपणीच्या सुखमय जीवनाची.

खेळावे, बागडावे, खावे, प्यावे, नाचावे, गाणी गावी आणि मस्तपैकी झोपी जावे. असा तो बालपणीचा काळ असतो आणि हट्ट हा तर त्या बालवयातील आमचा सर्वात मोठा हक्क असतो आणि बालहट्ट म्हणून त्या वयातील प्रत्येक हट्ट पुरवला जातो. मला आजही आठवते की, माझ्या बालपणी आई कधी मला राग भरु लागली की आजी लगबगीने धावून यायची आणि मला कडेवर घेत आईला म्हणायची काय ग दम भरतेस त्या एवढयाशा पोरीला! एखादी छोटीशी आगळीक हातून झाली तर शिक्षक आई–बाबा, आजी आजोबा, दादा ताई, साऱ्या मोठया माणसाची कडू तिकट बोलणी ऐकावी लागते.

आज चांदोबा बद्दल खरे ज्ञान मला अवगत झाले आहे. काव्यमय कल्पना कोमेजून गेल्या आहेत. त्यामुळे तुपात पडली माशी म्हणून चांदोबाला चिडवण्यातला आनंद आता लुटता येत नाही. लहानपणी आंगणात येणारा वासुदेव, माकडवाला, नंदीबैल सारे जण आपले कुणीतरी जवळचे वाटत त्यांच्या खेळाने खूप हसू येई आज ते हसू येत नाही कारण हे धंदेवाले आहेत, पोटासाठी ते माकडाला मन मानेल तसे नाचवतात, बैलाला 'बुगु बुगु' वाजवून मान डोलायला लावतात हे वास्तव उमगले आहे.

बालपणी मात्र अशी गाबलीरु घडली तरीही साऱ्या मंडळीकडून सतत कौतुकाचा, प्रेमाचा अविरत वर्षाव होत असे कशाचीही उणीव भासत नसत. कशाचीही चिंता देखील नसे. भोवतालचे सगळे जग कसे सुंदर लोभसवाणे वाटत असे. आकाशाचा निळसर रंग मला भुरळ घालत असे आभाळातील चांदोबा माझा लाडका सोबत होता. चांदोबाला माळवतांना माझी आई माझ्यासाठी त्यांच्याकडं दररोज त्याची जरीची टोपी मागत असे आणि मी रोज उत्सुकतेने व बालसुलभ निरागसतेने त्या टोपीची प्रतिक्षा करत असे.

बालपणात 'आपपरभाव' नव्हता घरातील भांडी घासणाऱ्या सखुबाईची मुलगी माझी मैत्रीण होती तीचे कपडे वा अशुध्द नाही याची खंत वाटते मग मनात येते. 'हे बालपण सरलेच नसेत तर........!

कु सायली विजय अर्धापूरकर
११ वा वाणिज्य

---

# ✻ वृक्षावल्ली आम्हा सोयरे ✻

संसारात राहूनही विरक्त जीवन जगणाऱ्या तुकाराम महाराजाचे हे बोल आहेत आपल्यासारख्या चांगल्या–बोलत्या माणसापेक्षा गावाबाहेरच्या जंगलातील, उपवनातील वृक्ष, वेल त्यांना आपल्याशा वाटतात. मानवी जगातील क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर अशा विकारापासून दूर असणारी ही झाडे वेली तुकारामांना जास्त आवडतात, कारण त्यांच्या सहवासात या महान भक्ताला आपल्या मनाशी संवाद साधता येतो.

खरे पाहता मानव आणि सृष्टी ही एकाच विश्वात्माची लेकरे पण आज माणूस निसर्गापासून दूर गेला आहे. स्वत: केलेल्या प्रगतीमुळे त्यांच्यातील अहंकार वाढला आहे. 'मला काहीही अशक्य नाही' असे तो मानतो. आपला भूतकाळ तो विसरुन गेला आहे. याच निसर्गाच्या कुशीत आपण वाढलो. हे तो विसला आहे. याच वृक्षावल्लीच्या सान्नीध्यात नित्य विहार करणाऱ्या आपल्या ऋषीमुनींनी 'वेद' रचले भारतीय संस्कृतीची भक्कम बैठक आम्हाला दिली हे सारे सोयीस्करपणे आपण विसलो आहोत.

प्रगतीचा कैफ चढलेल्या माणसांनी परमेश्वर निर्मित निसर्गावर घाला घातला आहे. विवेक हरवून बसलेल्या माणसांच्या चंगळवादाला उधाण आले आहे. मोठ मोठया इमारत पेटवण्यासाठी हारे सजवण्यासाठी वारेमाप जंगलतोड केली जाते. कायदयाचा बडगा उभा केला तरी कोटयावधी रुपयांच्या चंदनाची चोरी होतच आहे.

हे सारे पाहिले की वाटते हा माणूस किती अविचारी आहे! अरे हे वृक्ष वर्षानुवर्षे जंगलात उभे आहेत. ते तुमच्यासाठीच ना! त्यांची फुले, फळे, पाने, सावली हे सारे तुमच्यासाठीच आहे ना! म्हणून तर तुमच्या पूर्वजांनी त्यांची तुलना संत– पुरुषाबरोबर केली. वृक्ष बाहू पसरवून आपल्यासाठी पावसाची प्रार्थना करतांना आपल्या मुळांनी पायाखालची जमीन घट्ट पकडून ठेवतांना जमीनीची धूप थांबवतात वातावरणातील प्रदूषण टाळण्यांचा प्रयत्न करतात. अनेक अमूल्य औषधे देतात.

हे वृक्ष या वेली अनेक मौलीक गोष्टी आपल्याला देतात. उदात्तता, भव्यता आणि निर्मलता ही तर त्यांची ठेवच आहे. 'पण सर्वांशी समान वागणूक' हा त्यांच्या जीवनातून मिळणारा महान संदेश आहे.

कु सायली विजय अर्धापूरकर
११ वा वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

## * आई व बाबा *

'आई' शब्दात व्यक्त न होणारे उपकार असते. रोज आपल्या मुलांसाठी काम करणारी, स्वत: उपाशी राहून मुलांचे पोट भरणारी असते आई परिवारातील सदस्यांची सेवा करणारी त्रास सहन करुन मुलांना जन्म देणारी असते, ती आई.

आपण खुप नशीबवान आहो, कारण आपल्याजवळ आई आहे. देवाजवळ आई नसल्यामुळे ते आईची ममता व प्रेम घेण्यासाठी पृथ्वीवर जन्म घेतात. म्हणून मी म्हटले आपली कींमत खुप चांगली आहे.

लेखकांनी व कवींनी आई बद्दल खुप कादंबरी व कविता लिहिल्यात यातूनच आपल्याला आईचे महत्व समजते. मला वाटते आई सारखेच बाबा असतात. आई आपल्या वर खुप प्रेम करते. बाबाही आपल्यावर तेवढेच प्रेम करतात. आपल्या एखादया चुकीवर आई जरी रागवत नसली तरीही बाबा रागवतात पण या रागाचे आपण कारण शोधले पाहिजे आपण केलेली चूक पून्हा करु नये, म्हणून बाबा रागवतात. ज्यांना बाबा नसतात त्यांना विचारावे की बाबाचे महत्त्व काय असते. डोक्यावरची छत असतात बाबा, हात व पायातील बळ असतात बाबा. आभाळावरुन उंच दर्जा असते. बाबाचा म्हणून मी म्हटले आई —बाबा सारखेच असतात.

सुविचार

'आई बाबाची सेवा करणे हीच खऱ्या आदर्शवान मुला—मुलींचे कर्तव्य असते'.

कु कविता मारोतराव कंठाळे
११ वा वाणिज्य

---

## * अंधश्रध्दा एक शाप *

आज आपण २१ व्या शतकात जीवन जगत आहोत म्हणजेच आधुनिक काळात आपण सर्व राहतो. आपण आधुनिक काळात राहतोय हे सत्य आहे परंतू आपले विचार मात्र हे आधुनिक काळातील आहे का?हा प्रश्न स्वत:च्या मनाला विचारा मंग तुम्हाला समजेल की, आपले विचार कोणत्या काळातील आहे. तसेच आपल्या जीवनक्रिया वर्तणूक व बोलणे चालण्यांची पध्दत कोणत्या प्रकारची आहे. याचा विचार करा.

संतांनी आपल्याला समाजसेवा, माणूसकी, सर्वांना प्रेम करणे व संत गाडगे बाबांनी तर स्वच्छतेचा मूलमंत्र देवून जीवन जगण्यांसाठी एक नवीन दिशा दिली पण आपण काय केले?आपण त्यांच्या सर्व शिकवण विसरुन एका नविनच मार्गाचा अवलंब केला. अशी प्रथा आहे की, ईश्वर व अल्ला आपल्याला आकार देतात, पण आपण तर त्यांनाच आकार दिला. महादेवाच्या पिंडीवर किंवा शिवलींगवर हजारो लीटरने दूध टाकतो पण हेच दुध जर आपण भूकलेल्यांना, गरजूंना व आनाथाला दिले तर हिच खरी पूजा मानली जाते. तसेच अल्लावर चढविलेली चददर जर वस्त्र नसलेल्या व्यक्तीला दिली तर हाच खरा नमाज असतो.

आजचे पंडीत अनुस्वार गमावलेले आहे. म्हणजेच ते पंडीतच्या ऐवजी पडीत आहे. आजचे साधू हे आपला आर्थिक फायदा घेतात आणि आपण देवाच्या नावाने त्यांना आर्थिक फायदा घेऊ देतो. यातूनच राम—रहिम आणि आसाराम सारखे व्यक्ती जन्माला येतात. आश्चर्याची बाब म्हणजे अशा व्यक्तींना आपणच तर प्रोत्साहन देतो. 'एकवेळ देवावर विश्वास नसला तर चालेल. परंतू स्वत:वर विश्वास असला पाहिजे'. 'ओह माय गॉड' व '**PK**' या चित्रपटामध्ये स्पष्ट सांगीतले आहे की, साधू कधीच देव, ईश्वर नसतात ते फक्त आपल्याला मूर्ख बनवतात.

माझा म्हणण्याचा अर्थ असा नाही की, तुम्ही देवांवर विश्वास करु नका तुमची देवावर श्रध्दा असू दया. परंतू श्रध्दाला अंधश्रध्देमध्ये परिवर्तन होऊ देऊ नका.

कु. कविता मारोतराव कंठाळे
११ वा वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

## * स्त्रीभृण हत्या *

एक नाजूक टिचली मारली की, काचेच भांड तसाच हा स्त्रियांचं जन्म विधात्यांन निर्माण केलेली ही सृष्टी, हा निसर्ग त्याचा उपयोग घ्यायला एक नंदनालाही पाठवलं. अन निसर्गाला सृजनशील बनविणारी या जगाला क्षमा आणि शांती यांचा मूलमंत्र सांगणारी भविष्याला आपल्या ओटीत फुविणारी आणि गतकाळात आपल्या पदरात मुलविणारी स्त्री त्यांने निर्मिली.

''पिता रक्षती कौमार्या भ्राता रक्षती यौवने रक्षती स्थाविरे पुत्र न स्वांतत्र अर्हति''

स्त्री म्हणजे अणु, स्त्री म्हणजे करुणा. स्त्री व पुरुष ही संसाराची दोन चाके आहेत.

स्त्री भृणहत्या म्हणजे स्त्रीच्या गर्भात जीव असतांना त्यांचे लिंग परिक्षण करुन तो जीव स्त्री लिंग असल्यास त्या स्त्रीचा गर्भपात करणे स्त्री भृण हत्या होय. स्त्री ही क्षणभराची पत्नी व अनंतकाळाची माता आहे.

आजही स्त्रीला पेचात पाडून तिची बेअब्रु केली जाते आजही हुंडयाची मागणी करणारे स्त्रीला आत्महत्या करण्यांस भाग पाडतात. आजही स्त्रीची खरेदी–विक्री केली जाते. पुरुष स्त्रीला आपली मालमत्ता म्हणून वापरतो. मुलगी तरुण वयात आली लग्न झाले की तिचे सुख समाज बदलून टाकतो. तिचा सुख चांगला पगारदार नवरा. सोन्याचे, मोत्याचे दागीने अंगावर मिरवायला मिळणे तिच्या बाळगाटयाचा नट पिण्यांच्या गुंग असणाऱ्यांना अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेले तिचे अंतरंग दिसते.

नवरा चांगला मिळाला तरी भोगवादाचा कॅन्सर झालेला हा समाज हुंडयासाठी तिला उभ जाळून टाकतो. स्त्री ही अग्नीत जळण्यांची सतत समीधा टाकण्यांसाठी अंगावरच रॉकेल टाकूण मृत्युला जबाबदार असतात.

''छाज दहेज खालो, बहु को जला डालो'' म्हणणारा समाज या हुंडयाच्या अंधारातून केव्हा बाहेर येणार आहे? सर्वसामान्य स्त्री मध्ये कायदयाविषयी ज्ञान व आपण न्याय हक्कासाठी झगडण्याची तयारी असली पाहिजे तरच स्त्रीचे मरण त्यांच्या नशिबी येणार नाही. स्त्री ही कुणाची आई, बहीण, मावशी, आत्या आहे. स्त्री एकप्रकारे गायच आहे. होणारा अन्याय सहन करणे तोंड असून बोलता येत नाही.

कु विजया संजय मनवर
११ वा वाणिज्य

---

## * संताची शिकवण *

विश्वात्मक देवाकडे पायदान मागतांना संत ज्ञानदेवांनी जे मागीतले त्यात त्यांची इच्छा व्यक्त होते ते म्हणतात की माझ्या या भूमित 'संताची मांदियाळी' होऊ दे! संत. ज्ञानदेवांची ही इच्छा भगवंतानी पूर्ण केली.

संत हे 'संत' चे पूजक असतात. असत्‌ला ते नेहमी दूर ठेवतात. संत सदैव दुसऱ्याचाच विचार करतात ते स्वत:च्या सुख–दु:खाचा कधीच विचार करत नाही. म्हणून संत तुकाराम म्हणतात.

''जे का रंजले! त्यासी म्हणे जो आपुले!
तेचि साधु ओळखावा ! देव तेथिच जाणावा!''

संताचे कार्य हे सामाजिक प्रबोधनासाठीच असते. संत ज्ञानदेवांना अवघे एकविस वर्षाचे अल्प आयुष्य लाभले. पण अमूल्य जिवनाचा उपयोग त्यांनी इतरांसाठी केला. त्यांनी समाजाला खूप साऱ्या गोष्टीचे ज्ञान दिले. ऐकाल तेव्हांच ना समाज सुधारील संत ज्ञानेश्वरांनी १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. संत एकनाथ संत होते. त्याच बरोबर समाजसुधारक पण होते.

संत रामदासांनी आपल्या श्लोकातून माणसाने कसे वागावे, कसे बोलावे, चालावे याचे अचूक मार्गदर्शन आपल्या श्लोकातून केले आहे. ते सर्वांना सांगतात.

''मरावे परि किर्तीरुपे उरावे'' काहीही कृती न करणाऱ्यांना ते सांगतात.

''क्रियेविना वाचाळता व्यर्थ आहे''

संत गाडगे बाबांना कुणी केलेला नमस्कारही आवडत नसे. त्यांच्यापुढे वाकणाऱ्याला सांगत हातात झाडू घ्या. आणि भोवतालचा प्रदेश झाडून काढा. ते भक्तांना सांगत.

'तुम्ही पुढे चालत राहा, मार्ग नक्की सापडेल''

संत सदैव समाजाचाच विचार करत असतात. स्वर्थ सोडून ते परमार्थात म्हणजे पराच्या, इतरांच्या स्वास्थ्यातच रमामण होतात म्हणून संत मुक्ताबाई म्हणतात.

जग झालीया व हरी ! संते सुखे व्हावे पाणी !!

कु विजया संजय मनवर
११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

# * सहकाराची गरज *

सहकार या शब्दातूनच सहकाराचा अर्थ स्पष्ट होतो. सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे. प्रत्येकजण आज सहकाराचा झेंडा घेवून मिरवत असतो. पण मला असे वाटते की आपण सहकाराला डोक्यात उतरविले पाहिजे. तर आपण सहकार शिकलो हे पूर्णपणे सत्यात येईल तसे पाहिले तर माणूस हा सर्वच गोष्टीत स्वयंपूर्ण नाही. त्याला आपल्या गरजा पूर्ण करण्यांसाठी एकमेकांची मदत घ्यावीच लागते. म्हणजेच माणसाला जीवन जगण्यांसाठी सहकाराची आवश्यकता असतेच अनेक विचारवंतानी सुध्दा सहकाराची गरज कशी आपल्याला आपल्या जिवनात जाणवते याचे महत्व आपल्याला पटवून सांगीतले पाहिजे.

आपण जे म्हणतो आपल्या जिवनात सहकाराची गरज प्रत्येक वेळी पडते. पण सहकार आपल्या गरजा कशा पूर्ण करतो. हा प्रश्न आपल्या सर्वासमोर निर्माण होतो. याचे समाधान असे होईल की आज शेती सहकारी संस्थेमुळे आज अनेक शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारली आहे. शेतकरी सभासदांना सहकारी पतपुरवठा संस्था अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करतो. त्यामुळे त्यांची पैशाची गरज एकमेकांच्या मदतीने पूर्ण होवून त्यांची शेंती करण्यांची पध्दत सुधारते. म्हणजेच सहकारातून त्यांची गरज पूर्ण होते.

एवढेच नव्हे! तर सहकारी औद्यौगीक संस्था, सहकारी ग्राहक संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था अशा अनेक संस्थांच्या माध्यमातून आपल्या गरजा सहकारातून पूर्ण होतात. सहकारी ग्राहक संस्थामधुन ग्राहक एकत्र आल्यामुळे त्यांना जिवनावश्यक वस्तुची खरेदी करतांना अध्यस्थाना सामोरे जावे लागत नाही. परिणामी त्यांना स्वस्त व वाजवी दरात वस्तू उपलब्ध होते. सहकारी गृहनिर्माण संस्थामधुन आर्थिक स्थिती नसलेल्या लोकांची घराची गरज पूर्ण होते. म्हणजेच सहकाराची गरज आहे.

आपल्या जिवनातील प्रत्येक कार्यासाठी सहकाराची गरज आहे. आज सहकार हा मनुष्याचा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासाचे साधन आहे. आपल्या देशातील क्षेत्रांचा जलद विकास होण्यासाठी सहकाराची गरज आहे. आज ग्रामीण भागातील विकास घडवून आणण्यासाठी सहकाराची नितांत गरज आहे. देशाचा जर आपल्याला सर्वांगीन विकास घडवून आणायचा असेल तर आपल्याला सहकाराच्या माध्यमातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज आपल्याला आपल्या देशातील शेती, उद्योग, व्यवसाय, व्यापार यांच्यात विकास घडवून आणायचा असेल तर आपल्याला सहकाराची गरज आहे. म्हणून सहकारा शिवाय विकास साधने शक्य नाही. त्यामुळे ''विना सहकार, नाही उददार'' ही म्हंण प्रचलीत झाली. तसेच आपल्या जीवनात सहकार महत्वाचे आहे.

कु जयश्री रुपेश रणवावळे
११ वा वाणिज्य

---

# आजचा युवक / आजची युवापिढी / आजचा युगप्रवर्तक

आजचा युवक किंवा भावीपिढी यांचे भविष्य कसे असणार? हे निश्चितच कोणी सांगू शकणार नाही. त्याचे भविष्य उज्वल हे सांगणे अर्थात कठीण नाही का? त्याचे भविष्य चांगले की वाईट हे सर्व त्यांच्याच हातात आहे.

आजचा युवक हा व्यसनाच्या आहारी पूर्णता: गेलेला आहे. तसेच जात आहे. तो व्यसनाच्या जाळयात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष गुरपटल्या जात आहे मंग ते व्यसन कोणत्याही प्रकारचे असो तंबाकू, गुटखा, दारु, सिगारेट, आमली पदार्थ, धुम्रपान, मोबाईल इत्यादी सामान्यात मानवाचे ३ मुलभूत गरजा आहेत. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा होय. निवारा मोबाईल अशा झाल्या आहेत. आजच्या युवकाळामध्ये एक वेळचे जेवन नसेल तर चालेल पण मोबाईल हा हवाच बरोबर ना? काही युवक तर अक्षरश: मोबाईल, गाडी शिवाय जगु शकत नाही, अशी अजच्या युवकाची जणू मानसिकता तयार झालेली आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे जग खुप मोठया प्रमाणात प्रगती करीत आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे जगाला तर नवीन प्रकारची वळण प्राप्त होत आहे. तसेच देशादेशात विकास घडून येत आहे. मोबाईल ही जी वस्तू ती चांगली तसेच खराब आहे. असे आपल्याला म्हणता येणार नाही. परंतू आपण त्याचा कशा प्रकारे वापर करतो ते महत्वाचे आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे सामाजात आनेक लोकांचे संसांर उध्दवस्त झाले व आजूनही ते होत आहे. आणि चालूच राहणार. असाच एक मोबाईल संदर्भात आलेला लेख, लेखक माहिती नाही. परंतू ते लेख पुढील प्रमाणे.

''अभ्यासाची जागा 'Android' ने घेतली व त्या नादातच आज कालची कार्टी उशिरा झोपतात. त्यांना माहित नाही की विवेकानंद कोण?टिळक कोण? जिजाऊ कोण?सावित्रीबाई फुले कोण?मात्र प्रत्येकाच्या हातात 'स्मार्ट लेटेस्ट आय– फोन'' पुस्तकाची पी.डी.एफ. झाली. रोज वेगळा बीएफ व रोज वेगळा जीएफ आली. प्रगती होतय सांगत बिघडणारी नविन ऑनलाईन पिढी आली.

अंगठे दुखत: आहेत आता टाईप करुन, माणस भेटतात ऑनलाईन व्हिडीओ कॉल वरुन पाहुण्यांना भेटनं, पत्र पाठवणं जुना झाल आता. मॉर्निंग वॉक कधीचाच बंद झालाय 'Androld Market' मध्ये 'Temple run' जी आलय व्हर्चुल जमान्यात लांबच सगळे झाले. 'Connected' पण शेजारधर्म 'Was totally Disconnected' आई वडील यांचे संस्कार सुध्दा 'Dawnload' केले जातील आता या 'Technology' मागे पळता–पळता लोकांनी स्पर्धा परीक्षेत उतरणेच बंद केलाय.

आजचा युवक ज्या प्रकारे आपले जीवन जगतोय खरच तो जे जीवन चांगले की वाईट याचा विचार न करताच जीवन जगत आहे. आजचे युवक अरे, मित्रा जीवन एकच वेळ मिळते म्हणून का ते कसेही जगायचे नसते यावर मला सुरेश भटांच्या चार ओळी आठवतात. व नेहमी त्या आवडतात.

''आयुष्य छान आहे थोड लहान आहे, रडतोस काय वेडया, लढण्यांत शान आहे,  
कळठातही फुलाची झुलती कमाल आहे, उचलून घे हवे ते दुनिया दुकान आहे,  
जगणे निरर्थक म्हणतो तो बेश्मान आहे, सुखासाठी कधी हसाव लागत,  
तर कधी रडाव लागत कारण, सुंदर धबधबा बनयला,  
पाण्यालाही उंचावरुन पडाव लागत.''

म्हणून मित्रानो! आयुष्य हे चांगल्या पध्दतीने जगावे. जगण्यांचा प्रयत्न करावे. आपल्या कडून आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आशा व आकांक्षा असतात या आपण साधपणे पूर्ण करायला हव्यात तसेच सध्या स्पर्धेचे युग म्हणजेच धावपळीचे जीवन आहे. त्यात जर आपल्याला यश मिळवायचे असेल तर एक मंत्र आहे तो म्हणजे ''थांबला तो संपला'' मी प्रमाणे आपले प्रयत्न चालू ठेवून देशाच, आपला व आपल्या कुटुंबाच विकास घडवून आणावा.

स्वामी विवेकानंद यांनी आपल्या युवा अवस्थेत अनेक अतुलनीय कामगीरी केली आहे. त्यांनी आपल्या ज्ञानाच्या बळावर सर्वांना थक्क करुन सोडले आहे. तसेच 'श्री छत्रपती शिवाजी राजे भोसले'' यांनी वयाच्या १४ व्या वर्षी स्वराज्य स्थापणेची प्रतिज्ञा घेतली व असाच एक त्यांनी अत्यंत लहान वयातही पराक्रम केलेले आहे. तसेच पृथ्वीराज चव्हाण, महाराणा प्रताप यांनीही अत्यंत कमी वयात मोठे–मोठे पराक्रम करुन सर्वानांच थक्क करुन सोडले इतिहासाला सुध्दा थक्क करुन सोडले आहे. ते ही युवावस्थेत त्यांनी चांगले कार्य घडून आणलेले आहे.

आजच्या बालयुवकाला शालेय जिवनापासून विविध प्रकारचे व्यसन जडतात व ते वाईट मार्गाने लागतात व त्यांच भविष्य हे अंधकारमय होते. मग ती स्त्री असो की पुरुष असो. स्त्री ही विटाळाची खाण आहे. असे म्हणणे चुकीचे आहे. गितेत सांगीतल्या प्रमाणे 'नारी निंदा मत कर, नारी रत्न की खान है. जिसके पेट से पैदा हुए रामकृष्ण हनुमान है' खरच हे सत्य आहे. आज जिजाऊ नसती तर शिवराय नसते आणि सावित्री नसती तर आज महिलांना शिक्षणाचा महत्व कळल नसतं.

म्हणून माणसाला घडवण्यासाठी स्त्रिचा हात असतो. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका यशस्वी स्त्रिचा हात असतो. म्हणून आजच्या युवकाला आणि आई–वडील ज्याप्रमाणे संसार व संस्कार करतील त्याप्रमाणे त्याचे भविष्य घडवेल असे म्हणता येणार पण त्यालाही आजच्या युवाचा युवतीचा प्रतिसाद असेल तर त्याच भविष्य हे नक्कीच उज्वल आहे. त्यांना यशस्वी होण्यापासून कुणीच रोखू शकत नाही. साक्षात देव सुध्दा. म्हणून आजच्या युवापिढीने व्यसनाच्या वाईट कर्माच्या आहारी न जाता आपला व आपल्या कुटुंबाचा, समाजाचा विकास करावा तसेच देशाचाही विकास घडवावा. अशी मी विनंती करतो.

प्रार्थना करतो ईश्वर तुमच्या चांगल्या प्रयत्नांना यश देवो, यशस्वी भव.

अंकुश दादाराव डोके  
बी.ए.भाग– २



Scanned with OKEN Scanner

# * वेळ कुठे आहे *

अनेक संत महापुरुषांनी सांगीतले आहे. एकदा वेळ गेली की, पुन्हा येत नाही. पण आजच्या माणसांना (तरुणांना) हे कळत का नाही. आई—वडील वेळ चांगली जाईल म्हणून हाडाचे पाणी करून मुलांना शाळेत पाठवतात. पण आजची मुल यांना वेळ कळणार कुठे. ते तर फक्त दंगा मस्ती करण्याकरिता शाळा, कॉलेजमध्ये येतात. त्यांना त्याची जाणीव कुठे जे उन्हाळयात कष्ठ करतात व आपल्याला शिकवितात पण मुलांना मात्र टाईम वाचविण्यापेक्षा टाईम पास करण्यांत मजा येते. विद्यार्थी आहे म्हणून तो विसरुन गेला आहे. व आपल्या शिक्षकांशी चांगले वागत नाही. यांना कळेल केव्हा वेळ निघुन जाईल तेव्हा, शिवाजी महाराजांनी १६ व्या वर्षी हिंदवी स्वराज्य स्थापण करण्यांचे ठरविले कारण त्यांना माहिती होते की, 'वेळ' काय आहे. पण आजचे मुल १६ व्या वर्षी ठरवतो की, मला चांगला स्मार्ट फोन घ्यायचा आहे. काय करण्यांसाठी तर टाईमपास करण्यांसाठी.

आजच्या मुलांना आईवडीलांनी एक ग्लास पाणी जरी मागीतले तरी जवळ वेळ नाही. बाबांनी त्यांना कामात थोडी मदत जरी मागीतली तर अभ्यास आठवतो तो दोन मिनट मदत न केल्याने तो मोठा ऑफिसरच बनणार आहे. ठिक आहे बनेल त्यांना आनंदच होणार आहे. तुमच्याच आवडीचे मुली सोबत लग्न सुध्दा करुन देतील, पण तरीसुध्दा आपल्या आईवडीलासाठी वेळ मिळत नाही. आपल्याला लहानाची मोठी करणाऱ्यांसाठी वेळ मिळत नाही. पण पत्नीसाठी चंद्र तोडून आणायला वेळ आहे.

हे सर्व जाऊ द्या. पण माणूस आज कामात एवढा व्यस्त आहे कोणासोबत बोलण्यासाठी सुध्दा त्यांच्या जवळ वेळ नाही. पण मला वाटते त्यांच्याजवळ वेळच—वेळ आहे. मी त्यांना वाईट आहे असे म्हणणार नाही. कारण माणसांना मानसांशी जुळवण्यांचे हे साधन आहे. पण याचा आज वाईट वापर होत आहे.

'बघाणा' ज्यांच्याजवळ आई वडीलांसाठी वेळ नव्हता त्यांच्याजवळ आज **'Whatapp, Facebook'** साठी वेळ कोठून आलय, जो व्यक्ती रात दिवस त्यांना कामाशिवाय कांही सुचत नव्हते त्यांना हे सारे कसे सुचतय झोपेतून उठल्यानंतर, झोपेच्या अगोदर 'गुड मॉर्निंगचे व्हिडीयोज पाठवतात दिवसभर माकडासारखे तोंड करुन फोटो काढतात. व किती लाईक गिळतात हेच पाहत आहेत. हेच जर त्यांनी याचा चांगला वापर केला तर नक्कीच चांगला फायदा होईल.

आज माणसे आपल्याला घरात सापडणार नाही, पण **'Whatapp, Facebook'** वर नक्कीच सापडेल. आजच्या युगात देवाला सुध्दा माणसे येथेच सापडेल अशी एक कविता केली आहे. 'व्हायरस' प्रशांत अनासरे' यांनी लिहीलेली, ती येथे लागू पडते.

> देवाण माणसाला फेसबुकवरुन, फेंडरिक्वेष्ठ पाठवली, उत्तर आल नाही.
> देवाण माणसाला व्हॉटसॅपवरुन मॅसेज पाठविलां, उत्तर आल नाही.
> देवानी माणसाला लॅपटॉपवरुन मेला पाठविला. उत्तर आल नाही.
> माणसाच्या अस्तित्वाबद्दल अस्वस्थ झालेल्या देवाण,
> मग शोधल माणसाला गुगलवर जावून
> तर कॉम्प्युटरची रंगीबेरंगी स्क्रीन, काळवडत गेली हळूहळू,
> अन देवाच कॉम्पूटर खाडकन बंद पडला
> मॅकेनिक म्हणाला : ''देवा, कॉम्प्युटरमध्ये व्हायरस आलय,
> देव म्हणला : ''अरे पण, माणसाच्या शोधात गेलो होतो,
> मग व्हायरस कुठून आला? पण देवाला शोधुनही माणुस सापडला नाही.

पहा. येथे प्रशांत अनासरे यांचे मत सांगीतले आहे. माणसाजवळ देवासाठी सुध्दा वेळ नाही. शिवाय वाईट व्हिडीयो, सायबर क्राईम सारखे व्हिडीयो पाहायला वेळ आहे.

हयांच्याच मागे जर ''गांधीजी, लोकमान्य टिळक, सावरकर, छत्रपती शिवाजी महाराज, भगतसिंग इत्यादी लोक लागले असते तर विचार करा यांच्या मागे लागणारे कसे हे खरे भारत मातेचे पुत्र होते.

पृथ्वीराज सुनिल पवार
बी.ए.भाग— २



Scanned with OKEN Scanner

# * शिक्षक कसा असावा *

शिक्षक म्हणजे,

आयुष्यात कलाटणी देणारी प्रेरणा, ध्येयपूर्तीसाठी मार्ग दाखविणारी दिशा,
कधी चिकट परिस्थितीत, प्रेमाची साथ, तर कधी पाठीवरील शाबासकीचा हात,
कधी कौतुकाचे गोड शब्द तर कधी हातावर बसणारा छडीचा मार.

देशाची समृध्दी आणि श्रीमंती तथा देशातील जलसंपत्ती वनस्पती, खनिज संपत्ती आणि धनसंपत्ती यानून जशी मोजली जाते. तशीच ती बुध्दीसंपत्ती किती आहे?कशी आहे?आणि कशी वापरले जाते. यावर मोजली पाहिजे त्यावर त्या–त्या देशातील नागरीकांनी समान जिवनाचा सर्वच क्षेत्रात आपल्या बुध्दीचा वापर करुन किती उंची गाठली यावर मोजली पाहिजे. शिवाय मिळालेल्या शिक्षण याचेही मोजमाप सर्वांगिन आणि सुप्त गुणांना उत्तम विकास आणि भविष्याला आकार देणारी कर्तव्यनिष्ठ पिढी तयार करण्यांसाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही चिरस्थानी उपाय नाही. यासाठी कायदा फारसा उपयोगीच पडत नाही कारण कायदा माणसांवर सक्ती करतो, आणि शक्तीतून आशक्ती आणि आशक्तीतून विकृती निर्माण होते आणि ही विकृती कार्यक्षमता मोडीत काढते म्हणून चिरस्थानी अभ्युदयासाठी कायदा उपयोगात पडत नाही. अस माझ मत आहे.

सरकारी राजकारणी नेत्यांनी केलेला विचार लक्षात घेवून अभ्युदयाला उपयोगी पडतात. शाश्वत मूल्यांच प्रतिक म्हणून ही राजकारणी राजकारणांत वावरतात त्यांने त्यांच्या शब्दाला सामर्थ्य प्राप्त होते.

विनोबांनी शिक्षणावर आल्प करतांना फार मार्मिक सूत्र सांगीतले आहे. ते म्हणतात " शिक्षक विद्यार्थीनिष्ठ असावा, विद्यार्थी ज्ञाननिष्ठ असावा, ज्ञान समाजनिष्ठ असावेत आणि समाज समतानिष्ठ असावेत. "शिक्षक जर विद्यार्थीनिष्ठ असेल तर कळयांचे फुलात रुपांतर करु शकतो. पाठयपुस्तकाबरोबर उघडया जगाचे पुस्तकही शिकवतो. चांगल्या विद्यार्थीनिष्ठ शिक्षक हा सहवासातून संवादातून, आचरणातून, चारीयातून मनाची श्रीमंती असलेला कर्तबगार विद्यार्थी घडू शकेल, घडवतो आणि तो आपल्या पंचेद्रियांना ज्ञान सन्मुख करुन जिवनाला समृध्द करणाऱ्या संस्कारांचाही तो पेरणी करु शकतो.

खरे तर त्यातूनच साक्षर मतदार निर्माण करीत नाही तर तो कर्तव्यदक्ष नागरीक निर्माण करतात. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, दुसऱ्यांनी कोणत्याही उपायांनी नागरिक निर्माण करता येत नाही. ज्या समाजात मतदारापेक्षा नागरीकांची संख्या असते तो देश अजिंक्य ठरतो, इतरांसाठी आदर्श देश बनतो. असे सहज आणि सेवाभावी नागरिक केवळ उत्कृष्ठ असणारा शिक्षक निर्माण करु शकतो, हे विसता कामा नये, एवढेच नव्हे तर संस्कार संपन्न जिवनसृष्ठी हे देखील शिक्षणातूनच प्राप्त होत असते आणि आज समाजातील भिषण विषम, भिषम विकृती,पाहिली तर ती संस्कार शून्य शिक्षणाची परिनिती आहे असे वाटायला लागते की शिक्षणात सौंदर्य शिक्षणातच लपलेल असत आणि आचरणातील सौंदर्य, समाज जिवनातून प्रकट होत असतं. म्हणून शिक्षक घाणीने माखलेल्या चिंधीसारखा असता कामा नये.

देशाचा सर्वांगीन विकास आणि वृध्दीसाठी शिक्षणच आवश्यक का?याचाही आपण विचार करायला पाहीजे आणि त्यासाठी अध्यापनाला धर्म मानवाच्या शिक्षकाचीही अटळता आपल्या लक्षात येईल. शास्त्राने प्रदेश जिंकता येतो. पण मन जिंकता येत नाही, सत्तेने प्रशासन साधता येते, पण माणूस उभा करता येत नाही. माणसाची माणुसकी विकत घेता येत नाही. हया साऱ्या गोष्टी शिक्षणाने साध्य, सत्य होतात. शिक्षक त्याला मुर्त रुप देवू शकतो शिक्षण हे माणसाला अधिक उन्नत करते. परीपूर्ण करते. माणसाला पायापासून तर क्षितीजापर्यंत बघायला शिकविते शिक्षण माणसाच्या कौशल्याच्या गुणांचा विकासही करते आणि आपले जीवन अधिक समंजस्य करते. समाजातल्या साऱ्या विकृतीवरील एकमेव आणि अंतिम उपाय म्हणजे संस्कार संपन्न शिक्षण हाच होय. स्वामी विवेकानंदांनी ही व्यक्तीमत्वाची जडणघडण चारीयांची बांधणी, कौशल्याचा विकास मातृभूमीवर प्रेम, आणि मतांची श्रीमंती समृध्दी ज्यामुळे घडते ते खरे शिक्षण होय, असे म्हणायला हवे. म्हणूनच जपान, स्विडन, यासारखी राष्ट्रे सर्वाधिक खर्च शिक्षणावर करतात शिक्षण आणि संशोधनावर करतात.

शिक्षण देणारा शिक्षक कसा असावा याचा विचार करणे अनाठायी होणार नाही. शिक्षणाचे सामर्थ त्याचे माणूस घडविण्यांची क्षमता ओळखणारा शिक्षक असेल तरच शिक्षणाची सफलता आपणाला जाणवलेला अध्यापन हा पोटार्थी धंदा नसून तो धर्म आहे. ते केवळ उपजिविकेचे साधन नाही तर तो ऐतिहासिक प्रयोग आहे. ती केवळ अक्षर ओळख करुन देणारी आणि चार गणिते, दोन कविता शिकविणारी शाळा नव्हे तर कर्तबगार नवी पिढी घडविणारी प्रयोग शाळा आहे.

शिक्षणाकडे आणि शिक्षकाकडे पाहण्यांचा शासन आणि समाजाचा दृष्टीकोण फारसा गंभीर नसला तरी व्रतस्थ भावनेने ईश्वराची पूजा समजून आणि सामाजिक ऋणांची परतफेड करण्यांच्या भूमीकेने आमच्या शिक्षकांने मिशन म्हणून आपल्या सेवेकडे बघावे, नाहीतर हाताखालुन शिकून पुढे थोर पदाला गेलेला प्रत्येक माणूस प्रथम आठवण करतो तो आपल्या शिक्षकाची जिवनात त्याला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या प्रेमळ गुरुची कारण यात काहीही गैर नाही. जो माणूस जशा प्रकारचा त्यांच्या जिवनात घडला, तशाच प्रकारचा अनुभव तो आपल्या समोर मांडत असतो.

चंद्रशेखर श्रीकृष्ण खडसे बी.ए.भाग– २



Scanned with OKEN Scanner

# ※ मुलगा किंवा मुलगी म्हणून जगतांना ※

आजच्या या चालू धडामोडीमध्ये मुलगा किंवा मुलगी म्हणून कसे जगावे? याची जाणीव मला, माझ्या मैत्रीणिंना आणि माझ्या बहिनींना आहे. मुलगी किंवा मुलगा आहे हे या गोष्टीचा प्रभाव आमच्या शहरी भागांमध्ये जास्त न होता. खेडे या विभागामध्ये जास्त दिसून येत आहे. हे पाहतांना मनामध्ये एक वेगळा दुख: होते. भावना दुखावल्या जाते. मलाही विचार पडतो की, कसे जगावे. कसे राहावे. कोणत्या ठिकाणी जाणे चांगले आहे. कोणत्या ठिकाणी जाऊ नये. या सर्व गोष्टीचा विचार पडून येतो. पण कोणत्याही लोकांना हा विचार का येत नाही? मुलगा की मुलीमध्ये हा फरक पाडावा. त्यांनी एक विचार करायला हवा तो समोर दिलेला आहे.

''मुलगा हा वंशाचा दिवा आहे तर. मुलगी ही वंशाची पणती आहे.''

असे मना वाटते, कोणत्याही आई–वडीलांनी किंवा कोणत्याही लोकांनी मुलगा आणि मुलगी दोघानांही समान वागणूक द्यावी. असा विचार करु नये की, हा मुलगा आहे तर मुलाला जास्त शिक्षण द्यावेत मुलगी आहे तर मुलीला कमी शिक्षण द्यावेत. असा विचार न ठेवता की तू मुलगी आहे. तु शिकूण करशिल तरी काय?असे विचार ठेवूच नये. तसेच मुलगी किंवा मुलगा म्हणून जगतांना मुलगा–मुलगी असा भेद न करुन कुणीही मित्र–मैत्रीणी आले तर तेव्हा त्यांना चहा–नाष्ठा मुलीनेच करावे केला पाहिजे असे नाही. मुलीच्या तिच्या लग्नाच्या दृष्टीने नसून त्याच्या नोकरीच्या दृष्टीने आहे. असा त्यांच्या शिक्षणामध्ये भेद करु नये. कारण विचार मुलीच्या कानावर पडताच त्यांच्या भावना दुखाविल्या जातात. त्यांच्या शिक्षणातील गोडी कमी होते.

म्हणून मला म्हणा वेसे वाटते की,

एक सारीपाट दोन भिडू, पहीले खेळी माझी,<br>
दान मला पडल तरी, जित मात्र मुझी,

असा विचार माझा आहे. पण प्रत्येक मुलीचा विचार असाच असावा असे मला वाटते. पण माझ्या मताने प्रत्येक मुलीचा विचार असा आहे, असे नाही. मुलीचे मन नाजूक आहे. असे मी माझ्यावरुन सांगून कळते. कारणे आईवडीलांनी हा विचार ऐकूण मुलींना दु:ख होणे सहाजिकच आहे. म्हणून तिच्यासमोर असे शब्द न काढता त्याची ही गोष्ट त्याच्याच मनात ठेवावी किंवा तिच्या समोर उदगारुनच नयेत किंवा मुलीनेही स्वत: समोर होवून मुलगा  तर छान शिकू शकतो. तो त्याची इच्छा असेल तीथ शिकू शकतो आणि मी का नाही. असा प्रश्न मुलींनी त्यांच्या आईवडीलांसमोर मांडायला हवे त्याचप्रमाणे त्याचे हे विचार बदलवायला हवेत आणि ते मि बदलवणारच अशी इच्छा मनात ठेवयाला हवी. हा विचार मी मनात ठेवून मला म्हणावेसे वाटते की,

आयुष्याचे प्रयोजन तर उपाजतच समजलेले मोहाच्या निमंत्रणीला विविश झाले नाहीत.<br>
वादकाने थैमान घातले अंधार झाला तरी लोटलेल्या नौकेचे वल्हे सोडले नाही.

मला असे वाटते त्यांचे विचार एखदा जर बदलेल तर मिळून मुलींच्या शिक्षणांमध्ये त्यांच्या कोणत्याही गोष्ठीवर बंधणे येणार नाही. त्याचप्रमाणे त्यांचे विचार असतात की, मुलगी परक्या घरी जाणार आणि मुलगा तर नेहमी आपल्या घरी राहणारा असतात. मुलगा हा नोकरीवर लागून घरात त्याचा पैसा येणार त्याच्या आधारावर घर चालणार तो कमावून आणेल तर घरामध्ये काही पैसा येणारच असा विचार असतो जर मुलगी शिकलीच नाही आहे तिच्या शिक्षणाकरीता हातभारच  लावलेला नाही तर त्या समोर जातील कुठ! त्यांना घरामधील हिशेब सुध्दा समजण्यास अवघड जातील. जरी लग्न करतोच त्याच्या घरी लग्न त्यांच्या घरातील व्यवहार तरी त्याला समजायला हवा जर त्यांना हे करता आले नाही तर त्यांना त्यांच्या सासराकडून बोलणे खावे लागेल. या गोष्टीने त्यांना वेदना होतील याचा विचार प्रत्येक आईवडील व लोकांनी करायला पाहीजे. त्यांच्या मनात एकच विचार येतो, तो म्हणजे....

सावलीत होती तरी पाय पोळतच होते. फुटपाथवरचे दु:ख घरात असून जाळीत होते,<br>
मैफीलीच्या सुरात कधी बेहोश होते तरी कुणाच्या कव्हण्याने हृदय फुटत होते.

मुलीला या गोष्टीची दु:ख होते म्हणून पहिलेच त्यांचे जीवन कशाप्रकारे सुखद राहिल याविषयी काळजी घ्यायला हवी. आणखी सांगणे म्हणजे, मुलगी जन्माला आल्यावर खेळातूनच पुरुष आहे. त्यानुसार त्यांच्यावर भेदभाव केला जातो. ही मुलगी आहे, तर तिची खेळणी वेगळी असा भेदभाव करु नयेत. हा मुलगा आहे तर मग त्याला खेळण्यांसाठी चेंडू आणि बॅट देतात.

मला असे वाटते अशाप्रकारची बंधने तिच्यावर कमी करावीत असे असल्यावर तिची बाहेर जाण्याची इच्छा कमी होवून जाते. हा विचार मुलाच्या डोळयातील काजळ घालून त्यांना दिट लावण्यांस असतो, तो चराचराच्या सृजनाच्या आणि अंत असाच असतो. मुलीच्या समोरील अवंडर तसे खोटेच म्हटले पाहीजे ती जन्माच्या प्रत्येक जिवाला जगवतो सांभाळतो पण जगवण्याचा मिसाज मारत नाही, अनंतहस्ते ती देत असते. पण दात्यांच्या दबान त्या आणत नाही सृष्टीला फुलवितात पण निवांत होवून कधी मिरवत नाही. आपण फक्त तोंड देखलेत पण त्या फक्त प्रत्येक गोष्टी देतच राहतात. म्हणून त्यांच्यासाठी.



Scanned with OKEN Scanner

"आयुष्याचे फळ मधुर पिकले आहे.
तळ दिसावा निर्मळ..... नदीपात्र पूर्ण भरावे
भवतीचे काठ फुलविन तुझ्र आयुष्य फुलविन जावे"

मुला–मुलीमध्ये असणारा भेद मिटविला पाहीजेत. मुलगा व मुलगी यामध्ये काहीही फरक नाही जो मुलगा देवू शकतो, तेच मुलगी सुध्दा देवू शकते, असे विचार ठेवायला पाहीजे. मुलींकडून ही सुध्दा अनेकप्रकारच्या अपेक्षा इच्छात अशाप्रकारची अपेक्षा ठेवल्यावर मुलीही अधिक जोमाने त्यांच्या आयुष्यामध्ये प्रयत्न करतील आणि उंच भरारी घेतील म्हणून शेवटचे शब्द लिहीतांना......

मुलापेक्षा मुलगी बरी, प्रकाश देत दोन्ही घरी....

कु. राखी अशोक निचळ
बी.कॉम.भाग– १

# ⁕ सादरीकरण एक जिवनावश्यक कौशल्य ⁕

असे म्हणतात की, माणूस हा सामाजिक प्राणी आहे. तो समुह करुन राहतो. तो एकेकटा, स्वतंत्रपणे जगूच शकणार नाही. तो माणसांत, माणसांसोबत राहतो. तो त्याच्या जगण्यांचा आधारच आहे. हा आधार नसेल तर माणूस वेडापिसाच होईल. म्हणूनच बघा, प्राचीन काळापासून ते अगदी आजतागायत जगभर सर्व देशामध्ये माणसाला शिक्षा केली जाते. ती म्हणजे तुरुंगवासाची त्याला त्याच्या कुटुंबियापासून, मित्रापासून, समाजापासून तोडून टाकण्यांची ही शिक्षा असते. बाह्य जगाशी कोणताही संपर्क होऊ दयायचा नाही, हिच ती शिक्षा असते. ही शिक्षा माणसाला मृत्युदंडापेक्षाही भीषण वाटत आलेली आहे. समाजात राहणे ही त्यांची जिवनावश्यक गरज आहे.

समाजात राहायचे म्हणजे दुसऱ्यांच्या सोबतीने, त्याच्या सहकार्याने राहायचे. म्हणूनच ज्यांच्या सोबत आपण राहतो, वावरतो त्यांना आपल्या इच्छा आकांक्षा तडे न जाता आपल्या मनाप्रमाणे जगता आले पाहिजे. म्हणूनच आपल्या कल्पना भावना, विचार इतरांना समजावून सांगणे हे अत्यंत कौशल्याचे ठरते. त्याच्यासाठी समजावून सांगण्यासाठी खास युक्तीवाद करावा लागतो. ही सर्व पध्दत म्हणजेच 'सादरीकरण' होय.

सादरीकरणाशिवाय माणूस नाही. सादरीकरण हा माणसाचा जगण्याचा एक भाग आहे. आपले बोलणे, चालणे, उठणे, बसणे, हातवारे करणे किंवहुना आपली देहबोली हे आपले सादरीकरणच होय. या सादरीकरणातूनच आपले व्यक्तीमत्व व्यक्त होत असते.

आपण फारच थोडया कृती एकटयाने खाजगीरित्या करतो. आपले बहुतांशी जगणे इतरांसमोर घडत असते. म्हणजे आपण इतरांसमोर सदोदीत सादरीकरणच करीत असतो म्हणा ना!

हे सादरीकरण अनौपचारीक पध्दतीने घडत असते. म्हणूनच आई वडील किंवा अन्य वडीलधारी माणसे उठता बसता काळजी घे. असा उभा राहू नकोस. तसा राहा. या अशा सूचना करतात. इतरांसोबत आपले व्यक्तीमत्व चांगल्या रीतीने प्रकट व्हावे. ही त्यांची इच्छा असते. म्हणजेच आपल्या देहबोलीला, आपल्या वागण्या–बोलण्याला किती महत्व आहे. हे लक्षात येईल.

मात्र, आताचे जीवन खूप जटील बनले आहे. खूप व्यामिश्र बनले आहे. जागतिकीकीणामुळे संपूर्ण मानवी जिवनच ढवळून निघाले आहे. कामांचे स्वरुप व व्याप्ती वाढली आहेत. संगणक, इंटरनेट, मोबाईल यासारख्या माहिती तंत्रज्ञानाच्या दुतामुळे सर्व व्यवहाराचे स्वरुप आरपार बदलले आहे. सामाजिक, सांस्कृतीक क्षेत्रात अनेकानेक घडामोडी घडताहेत, यासाठी चर्चा, परीषदा, मेळावे, बैठका, समेलने, शिबिरे इत्यादी आयोजित केली जात आहेत. माणसांना विविध कारणांनी असे एकत्र यावे लागत आहे. अशा वेळी समूहासमोर आपल्या कल्पना, आपले मत व्यक्त करण्यासाठी, सगळयांना आपले विचार समजावून सांगण्याची वेळ येते. आधुनिक काळात या सगळयाला आपल्याला सामोरे जावे लागत आहे. हे टाळता येणे शक्यच नाही. अन्यथा आपल्याला नोकरी, धंदा वा व्यवसाय करताच येणार नाही. येथे सादरीकरणाचा संबंध येतो, अशा या सादरीकरणाशिवाय आपण जगुच शकणार नाही.

काही वर्षापूर्वीच जीवन हे शांत, संथ होते. तेथे कोणाला, कशाचीही भिती नव्हती किंवा अगत्यही नव्हते. म्हणून कोणीही सैलपणाने वागला तरी ते चालून जाई. आता मात्र ते शक्य नाही. म्हणून सादरीकरणाचा अभ्यासही करावा लागेल दुसऱ्यासमोर आपण सादर होतो तेव्हा उभे राहणे, बोलणे, हातवारे करणे या सगळयाचा काटेकोर अभ्यास करावा. लागेल, कोणत्या हेतूने व कोणत्या प्रकारच्या लोकांसमोर आपण उभे राहणे, तसेच उभे राहीलो आहोत. हे लक्षात घेवून आपल्याला आपल्या सादरीकरणाची रीत ठरवावी लागेल. सादरीकरण हे आता दुर्लक्ष करण्याएवढा विनामहत्वाचे राहीले नाही. आपण या शाळा कॉलेजात अभ्यास करतो, तसा सादरीकरणाचा अभ्यास करावा लागेल. सातत्याने सराव करावा लागेल तरच आपला आधुनिक जगात टिकाव लागणार आहे.

अमित सुभाष चव्हाण
बी.कॉम.भाग– १

# ※ स्पर्धा परीक्षा एक आव्हान ※

आज २१ व्या शतकात आपण मानव म्हणून जीवन जगत असतांना आपले जीवन अधिकाधिक सुखकर, सुयोग्य करण्यासाठी तसेच आपल्या इच्छाआकांक्षा पूर्ण करता येण्यासाठी सर्वात महत्वाचा मार्ग म्हणजे.... शिक्षण. शिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे नोकरी मिळवणे एवढयापुरते मर्यादित जरी नसले तरी नोकरी म्हणजे शिक्षण आणि शिक्षण म्हणजे नोकरी हे समिकरणच आजच्या युवा पिढी मध्ये तयार झालेले आहे. मग नोकरी मिळविण्यासाठी ही सर्व युवापिढी बेधुंद होवून वेगवेगळया मार्गांनी धावत सुटलेली आहेत. त्यातलाच एक महत्वाचा पण किचकट मार्ग म्हणजे स्पर्धा परिक्षा....

स्पर्धा परीक्षा हा शब्द उच्चरला तरी काहींच्या अंगावर काटे उभे राहतात. कारण हजारो लाखोंच्या संख्येने या स्पर्धा परीक्षेच्या रणांगणात उतरलेल्या विद्यार्थ्यांपुढे आपला निभाव लागेल की नाही हा सर्वांचाच महत्वाचा प्रश्न असतो.

मग जो तो आपली निती अवलंबितो. आपला स्वत: चा वेगळा मार्ग निर्माण करुन पाहतो, पण हे सर्व वाटेल तेवढे सोपे नसते. म्हणून स्पर्धा परीक्षा सर्वांसाठी आव्हान झालेले आहेत.

वेगवेगळया पदांसाठी होत असलेल्या परीक्षांमुळे जी काठीण्य पातळी असते. ते हळूहळू दिवसेन दिवस वाढत चाललेली आहेत. त्यामुळे नेमके कोणत्या विषयाशी कुठल्या प्रकारच्या पुस्ताचा वापर करायचा, कोणत्या लेखकाचे विचार उपयोगामध्ये पडेल, कोणत्या शिक्षकाकडे क्लासेस लावायचे, अभ्यास कसा करायचा, अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांचा गोधळ विद्यार्थ्यांच्या मनात उडालेला असतो.

या स्पर्धा परिक्षांमधून बाहेर पडून उच्चपदी काही पोहोचलेल्या सर्व दिग्गजांची मते वेगवेगळी असतात. ते फक्त ऐकायला गोड वाटते पण प्रत्यक्ष कृतीत उतरत असतांना ते फार कठीण जाते.

गोधळलेल्या मनस्थितीची मुले मग शेवटी हताश होतात. कारण प्रयत्न करुनसुध्दा त्यांच्या हाती यश येत नाही. अशावेळी सतत प्रयत्न करत राहणारा यशाचा शिखर गाठतो. बाबासाहेबांनी त्यांच्या एका पुस्तकामध्ये असे म्हटले आहे की,

**'In a day when you don't Come across any problem, you can be sure that you are travelling on the wrong that......'**

याचा अर्थ असा की, ज्या मार्गाने तुम्ही मार्गक्रमण करत आहात त्या मार्गावर जर तुम्हाला अडचणी निर्माण होत नसेल तर तुम्ही चुकीचा मार्ग निवडला आहे असे समजावे.

बाबासाहेबांच्या मते असे आहे की, तुम्ही अडचणींना घाबरुन जावू नका तुमच्या वाटेवर समस्या येतील त्याचा सामना करा. स्पर्धापरीक्षेबाबत बऱ्याचदा विद्यार्थ्यांच्या मनात अनेक संभ्रम

निर्माण होतात. अशावेळी त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. ते मिळाले तर योग्य अन्यथा पुन्हा 'जैसे थे वैसे' ची स्थिती निर्माण होते. शेवटी जाता जाता ऐवढेच बोलू इच्छितो.

**'Always all the right things are not possible and always all the possible things are'nt right..... be true to your heart you will never go wrong.....**

कु.रुपाली तायडे, बी.ए.भाग– ३

# मुलाला जन्म देण्याअगोदर मुलीचा सन्मान करायला शिका

अरे मुलगी मुलगी,
संसाराचं चालवते गाळं
अरे तुम्ही तीचा
कारे करता रे छळ!

अरे देवाची देन ती,
तुमच्यासाठी आली
सर्वांच्या सुखासाठी
दिन--रात्र झटली.

अरे कारे करता
तिच्यावर अन्याय
तुम्हा जन्म दिला
तीचा गुन्हा काय?

अठरा वर्ष झाले की,
सोडावं तिनं माहेर
नंतर चालवावे तिने
जन्मोजन्मीचा संसार

सर्वांना आनंदी ठेवून
त्यातच मानिते समाधान
आई--वडीलांच्या खातीर
दु:ख घेते ती गिळून

तीचे हृदय एवढे
त्यामध्ये सर्व राहते
सांगावे तेवढे
तेही कमी पडते

अरे तीला सुध्दा जीव
ती आहे रे मानव
तीचा वापर करता
समजून हैवान

तीला हवा रे आदर
सन्मानानं जगणं
तुमच्या स्वार्थासाठी
तीचं करता मरण

कुळाचा दिवा
म्हणता मुलाला
मुलीचा तुम्ही
खेळंच मांडला

गर्भात असतांना
त्या छोटया जीवाला
मारुनी टाकता
थोडीसी लाज तुम्हाला.

मुलगी ती आहे
तीचा गुन्हा काय
तुम्ही सुध्दा गुन्हेगार
स्वत:ला समजता काय?

तिने सहन केला अत्याचार
जेव्हा होती ती अबला
करु नका अशी भूल
ती आता झाली सबला

कु. संजीवनी विजय राउत
वर्ग : १२ वी कला



Scanned with OKEN Scanner

# ❊ आमचे सर ❊

सर्वांना ज्यांचे लागत असे भेव
पन मला दिसत असे त्येंच्यातचं देव
ज्यांना होती ख–या शिक्षणाची जाण
तेच होते आमच्या हायस्कूलची शान.
ज्यांना पाहून बदलत असे, वारा आपली दिशा,
त्यांनीच दिली जीवनाला कलाटणी माझ्या
जे करीत होते आपल्या कर्तव्याचे पूजन
त्यांनीच घडविले आम्हां विद्यार्थ्यांचे जीवन.
आठवणीत राहतील ते, आम्हा विद्यार्थ्यांना ते जीवनभर
मी प्रार्थना करते देवाला, सर्वांना मिळो असेचं सर.
काय लिहावे त्यांच्याबददल, शब्दांच सूचत नाहीत,
कर्तव्यच त्यांचे इतके महान की, शब्दात व्यक्त होत नाही.

कु.जयश्री रुपेष रणबावळे,
वर्ग : ११ वी कला

---

# ❊ अदृष्य बाबा ❊

दिसत नाहीत ते जगात,
पण दिसतात माझ्या मनात.
आठवण करते मी त्यांना,
माझ्या आयुश्याच्या प्रत्येक क्षणात.
फुलविले असते त्यांनी माझे जग,
जर असते ते माझा आधार.
वाटतं मला त्यांच्याशिवाय जीवन हे निराधार.
इच्छा आहे मनात, पुर्ण करेन त्यांचे स्वप्न.
नाही पुर्ण झालं तर व्यर्थ मानेन जीवन जगणं.
वाटते माझ्या मनाला, एक प्रश्न विचाराव देवाला,
सुंदर सृष्टीतलं शाश्वत सौंदर्य,
तु का रे पाहू दिलं नाही माझ्या बापाला.

कु. जयश्री रुपेष रणबावळे,
वर्ग : ११ वी कला



Scanned with OKEN Scanner

## * आई *

तपते जी ऊनात आणि, देते मुलांना सावली,
जन्म दिला जीनं मला, धन्य ती माऊली.
देते आम्हांला उजेड, आणि जगते स्वत: अंधारात,
जो ऐकतो तिच्या मनाने, त्यांच्याच जीवनाचा घडतो इतिहास.
काहीच नाही मनात जिच्या, निर्मळ जीचे मन,
देते मुलांच्या आयुष्यासाठी, ती आपला प्रत्येक क्षण.
स्वत: जगते वा—याप्रमाणे, पण देते मुलांना आधार,
काय करावे असे बरं, ज्यानं फिटतील तिचे उपकार.
काय सांगू तिची किमया बाई,
मी प्रार्थना करते देवाला,
प्रत्येक जन्मात मिळो, मला अशीच आई

कु. जयश्री रुपेष रणबावळे,
वर्ग : ११ वी कला

---

## * आई *

आई माझ्या काळजाचा श्वास
आई माझी फुलांची आरास
फिटणार नाही कधी ऋण माऊलीचे
तपाल्या उन्हात आहे आभाळ माऊलीचे
असेल कुठे लेक तुझा आई
तुझी सावली असेल आस—पास
आई माझ्या काळजाचा श्वास.

कोण मला उदया उठवेल
कोण मुखी घास भरवेल
कोणावर मी उदया रुसेल
कोण माझी आसवे पुसेल
शोधू कोठे कोठे आई
आता आहे तुझा भास
आई माझ्या काळजाचा श्वास

संपली मुझी माझी कहाणी
कोणाला देऊ आज दोष
जिवाला माझ्या हूरहूर
पाण्यांत आसवाचा पूर
चाललीस आहे आई आत दूर
शोधू कूठे कूठे तुला आई
आई माझ्या काळाचा श्वास.

कु विजया संजय मनवर
११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

# ✲ आमचे बाबा ✲

बाबा आमचे आहे छानंच, आठवण येते रोजचं
किती त्यांचे उपकार
पण कोण समजून घेणार
त्यांची ही किमया
शिक्षण मिळते आम्हा
न कधी केला नकार
त्यांनी आम्हा सर्वच दिले
बाबांचे चांगले संस्कार
पोटाची खळणी करुन
आम्हा शिकवलं त्यांनी
त्यांचे स्वप्न करणार पूर्ण
सुंदर सृष्टीतल शासवत सौंदर्य
तुम्ही पाहू दिलं आम्हा.
किती दिवस झाले
बघीतल नाही त्यांना
आठवण येते रोजचं
असे म्हणते मी रोज देवाला
असे बाबा मिळो सर्वाला

कु विजया संजय मनवर
११ वी वाणिज्य

---

# ✲ हुंडा ✲

गेला जमाना जमाना हुंडयाचा, काळ बदला पोराच्या बापाचा
नाही याला राहायला घर, हुंडा मागतो दहा हजार
याला पैशाचा हिशोब समजेना, नाही शिकला बाराखडी
हुंडा मागतो हाताला घडी, याला घडीचा टाईम समजेना
नाही घरी बैलाची जोडी, हुंडा मागतो मोटारगाडी
याला गाडीचा ब्रेकच समजेना
काळ बदला पोराच्या बापाचा!

कु गायत्री विनोद राउत
१२ वी कला



Scanned with OKEN Scanner

## ✻ वनातले पक्षी ✻

या वनातून त्या वनात, गेले होते मी भेटायला
सूर त्यांचा गितांचा ऐकायला ,जे होते माझ्या मनात

पक्षी सारे उडून गेले कोठे, त्यांना आवाज मी शोधू कोठे
यारे पक्षांनो भेटून जा रे, सूर माझ्या सुरात मिसळून जार

या वनातून त्या रानांत, पसरले पिवळे हिरवळ शालू
झाडे माझ्याशी लागले बोलू, या रे माझ्या या वनात

नदी कलकल करीत आहे, वारा माझ्याशी खेळत आहे.
सूर मिसळू त्यांच्या रानात, या वनातून त्या वनांत

कु.शिंपल विनोद राठोड
१२ वी कला

---

## ✻ बाप ✻

कॉलेजमध्ये सोबत जातो, हॉटेल शोधतो
स्वत: फाटकं बनियन, घालून तुम्हाला
जिन्सची पॅन्ट घेवून देतो, तो बाप असतो.

जातांना पोरगी सासरी, धाय मोकळून रडत
माझ्या चिऊला निट ठेवा, असे हात जोडून सांगतो
तो बाप असतो.

स्वत: टपरा मोबाईल, वापरून तुम्हाला
स्टायलीश मोबाई घेवून देतो
तुमच्या कॉलेजचे पैसे स्वत: भरतो, तो बाप असतो

चांगल्या शाळेमध्ये पोरांना टाकण्यांची धडपड करतो
डोनेशनसाठी उधार आणतो, वेळ पडली तर हाता–पाया पडतो
तो बाप असतो

लव्ह–मॅरेज करायला निघलं, तर खूप चिडतो
संगळ निट पाहलं का? म्हणून खूप ओरडतो.
बाबा तुम्हाला काही समजतं का, असं ऐकल्यावर खूप रडतो
तो बाप असतो

कु.वैष्णवी राजेश लुंगे
१२ वी कला

## ✻ कन्यादान ✻

चिमणी माझ्या दारातली, क्षणात गेली उडूनी भूर्रकनी
प्रेम तिच्यावर केले मी, ख जिव्हाळूनी
आनंदाने बागडणारी बाप, म्हणूनी बोलवणारी
शेवटी माझीच पोर झाली, मला पोरकी
कधी पडल्या तिच्या अंगावर अक्षता मंगलाष्टकांच्या
मला कळलेच नाही.
कडेवर खांदयावर खेळणारी, आज मांडवात उभी
डोळ आसवाणी तुडुंब भरले, बालपण तिचे आठवू लागले
लेक चालली सासराला, माहेरचा उंबरठा ओलांडला
हातावरती पाणी सोडले, कन्यादान मी तिचे केले
चिमणी माझ्या अंगणातली, क्षणात गेली उडूनी भूर्रकनी

कु वैष्णवी अ. थोरबोले
बी.कॉम.भाग– १

---

## ✻ जीवन असे जगावे ✻

जीवन म्हणजे काय असत?
फुलांप्रमाणे जगायच असत.
जीवन म्हणजे काय असत?
नदीच्या प्रवाहाप्रमाणे वाहायचं असतं
जीवन म्हणजे काय असतं?
चंदनाप्रमाणे झिजायच असतं
जीवन म्हणजे काय असत?
चंद्राप्रमाणे शितल व्हायचं असतं
जीवन म्हणजे काय असत?
आठवणीवर जगायचं असत
जीवन म्हणजे काय असत?
मागे आठवणी सोडत जायचं असतं

कु वैष्णवी अंकुशराव थोरबोले
बी.कॉम.भाग– १



Scanned with OKEN Scanner

## ✻ मोहक पावसाळा ✻

मनाला भेदणारा असा तो पावसाळा, पावसाळयातील
काही पावसातील आनंदाचे क्षण...
मनाला ओले चिंब करून जातात
तो मातीचा दरवळणारा सुगंध डोळयासमोर त्या कोमल
नाजूक फुलांची उधळत चाललेली
लली मनाला रंगवून जातात...
ओले चिंब करणारा पाऊस तनाला आणि
मनाला हळूच स्पर्श करून
जाणारा तो गार वारा....
त्यात उत्साह आणि स्फूर्तीने आलेला
मोहक सुगंध त्या उमगलेल्या कळीचा....
रिमझीम–रिमझीम पडणाऱ्या पावसाच्या तालावर मी,
चिमण्याचा चिव–चिवतेच्या सुरावर
डोलणारे ते हिरवे गार झाडावरचे पर्व....
खरंच मनाला भेदणारा असतो तो पावसाळा,
हृदयाच्या आरपार जाऊन कोसळणारा.

कु वैष्णवी अंकुशराव थोरबोले
बी.कॉम.भाग– १

---

## ✻ आव्हान ✻

कितीही हरणार आहेस तू, एकदा जिंकूण तर बघ
खाली काय आहे, एकदा वर येवून तर बघ,
जीवनात काय आहे हे, जीवन जगून तर बघ,
जिवन–मरण यातल्या वेदना, सहन करून तर बघ,
यश तूला मिळत जाईल, प्रयत्न करून तर बघ
एकदा फक्त एकदाच, गरूडासारखी झेप घेवून तर बघ,
कितिदा हरणार आहेस तू,
एकदा जिंकून तर बघ.

कु वैष्णवी अंकुशराव थोरबोले
बी.कॉम.भाग– १

## * व्यसनाचे बळी समाज *

व्यसन करुन भाषण देणं किती मजा आहे.
हे समाजात पाहील तर किती मोठी सजा आहे!
शहाणपण आहे माझं पिण दारु,
घरी गेल्यावर पोर म्हणतात, आता तूला किती मारु!
जात होतो खेळायला मटका, पण बायको म्हणते घरातून सटका!
घरात आहे माझे नांव हिंम्मत, बायकोजवळ नाही माझी किंम्मत!
१८ वर्षाच्या वयात होता मी खुप तरुण
२५ वर्षाच्या वयात लग्न केलं समाजाला धरुन!
बयको म्हणते आपण बांधु कधी माडी,
पण माझी आवकात नाही घेवून दयायची साडी!
दारु—दारु करुन काय मरणार हाव, पोर—पोर करुन काय जगणार हाव!
दारु पित होतो तेव्हा विकले तूरीचे कटटे,
आता काम करु—करु पडत हाय पट्टे!
काळाच्या ओघात मुलबाळ आहे चार,
मला नाही वाटत हा जिवन होईल पार!
मला कळल की दारु पिवून काही नाही मिळणार,
पण आता दारु बंद करुन घरसंसार चालणार!
बायको म्हणते तेच खरे आहे. म्हणूनच माझे जिवन खूपच बरे आहे!
बायकोचं खरे असेल तरच त्याच माना, चुकीचे असेल तर गालफाडीत हाना!
दारु सोडून मला सगळच कळलं, जिवनातला हा खरोखरच संकट टळलं!
''म्हणूनच भारत वाशियांनो माझं ऐका,
व्यसनमुक्त होवून सुरळीत जिवन जगा'' धन्यवाद!

अमित सुभाष चव्हाण
बी.कॉम.भाग— १

---

## * शेतकऱ्याची गती *

नाही करायची यंत्रान शेती, मला करायची बैलानं शेती,
यंत्राला दयावा लागतो धन, माझ्या बैलाला दयावा लागत नाही कण!!

नाही लावायचं मला मजूर, घरीच करतो सारे काम,
मजूर लावायला खर्च होतो धन, घरच्यांना नाही दयावा लागत कण!!

पैसा खर्च करुन देतो सरकारले माल, पण हा सरकार किती करतो आमची कमाल,
फक्त हयांच्यातच घुसलय राजकारण, शेतकऱ्याला कमी जास्त दर्जा दयायच!!

चार महीणे लगातार काम करुन, फक्त शेतीच्या साधनाला धरुन,
गेलो या जिवनात काम करु—करुन, या जिवनात नाही यायचं मला फिरुन!!

अमित सुभाष चव्हाण
बी.कॉम.भाग— १



Scanned with OKEN Scanner

## * पण *

शिकायच होत इंग्लिश मला, पण शिक्षक बरोबर नाही,
शिकायच होत हिंदी मला, पण गाव सोडून गेलो नाही,

करायची होती शेती मला, पण बापन साथ दिली नाही,
खेळायची होती मला कुस्ती, पण मैदानी कुणीच उतरत नाही.

करायच होत धंदा मला, पण त्यातल काही समजत नाही.
बांधायचा होत घर मला, पण पैसे कमविता आलं नाही.

करायच होत लग्न मला, पण पोरगी कुणी देत नाही.
मरायच होत मला, पण आत्महत्या करता येत नाही.

अमित सुभाष चव्हाण
बी.कॉम.भाग– १

---

## * पावसाळयात भिजवणारी भेट *

देल निमंत्रण प्रेमान पावसाळयाला,
मानलं आभार प्रेमान उन्हाळयाला,
फक्त आठवण आहे पावसात भिजण्याची
सगळे तयारी करुन बसलेय मी
हातात हात देवून जाऊ निसर्गात
या निसर्गरम्य वातावरणात जायच मला स्वर्गात.
करना एकदा तरी इशारा भेटीची,
ना सांगताच येईल जिथे तू बोलावशिल.
जिवनाच्या बाहेर जावून तरी बघ,
फक्त तूला माझ्या प्रेमाचिच दुनिया दिसेल.
माझ्या अंतरात तुझाच चेहरा आहे.
पण तुझ्या मनात माझ्याविषयी काहीच नाही

अमित सुभाष चव्हाण
बी.कॉम.भाग– १

## * उघडली माझी शाळा *

उघडली माझी शाळा गेले खेळण्यांचे दिवस,
करावे लागणार आता अभ्यास बरेच दिवस.
सुट्टीचे दिवस केले आनंदाने पार, शाळेतील दिवस जाईल कठीण फार,
शाळेचा अभिमान आहे त्यालाच आहे गर्व
समाजासाठी शिक्षण हेच त्याच कर्म
अभ्यासाचा पर्वत घ्यावे लागल मला गाठून, एवढं अभ्यास केलं पण राहील पाहीजे साठून,
दयावे लागल मला शाळेलाच वेळ,
बंद करावे लागणार मला सारे खेळ
शालेय जिवनात करायची नसते मस्ती, नापास झाल्यावर कळते सारी भक्ती,
शाळा सुरु झाल्यावर भेटते नविन पुस्तक,
नविन–नविन दिसल्यान खुश होत मस्तक
शाळा शिकल्यावर राहतो आपण सुखानं, शाळा सोडली तर मरावे लागणार भूकानं

अमित सुभाष चव्हाण
बी.कॉम.भाग– १

---

## * कसे सांगू *

तुला बघीतल्यापासून रोज मला स्वप्नात तू खुनावतेस
कसे सांगू तुला की तू मला आवडतेस
कोमल तुझ्या चेहऱ्यावर हसू जेव्हा उमलते
ढगाआडच्या चंद्राप्रमाणे तेव्हा तू लाजते
लाजून अशी तू तेव्हा माझ्या मनाला सुखवतेस
कसे सांगू तुला की तू मला आवडतेस
सोनेरी केस तुझे हवेत जेव्हा हेलावते
बोटांनी तू तेव्हा त्यांना कुरवाळते
कुरळ करत केसाची तू तेव्हा एलावतेस
कसे सांगू तुला की तू मला आवडतेस
तेजस्वी तुझ्या डोळयावर तू पतन जेव्हा लपवतेस
आणि तीरप्या तुझे नजरेने तू माझ्याकडे बघतेस
भास माझा वाटतं तू मला बोलावतेस
कसे सांगू तुला की तू मला आवडतेस
तुच माझं प्रेम आता, माझ संपूर्ण जीवन तू
तुच माझं काळीज आता, माझा अविभाज्य भाग तू
भावनांना या माझ्या का तू समजून घेतेस
कसे सांगू तुला की तू मला आवडतेस

विशाल मनोहर ढेंगाळे
बी.ए.भाग– ३



Scanned with OKEN Scanner

## ✻ वेळेचे महत्व ✻

एका वर्षाचे महत्त्व काय असते हे परिक्षेत नापास
झालेल्या विद्यार्थ्याला विचारा
एका महिण्याचे महत्व काय असते हे.
बाळाला अकाली जन्म देणाऱ्या आईला विचारा
एका दिवसाचे महत्व काय असते हे
साप्ताहिकाच्या संवादकाला विचारा
एका तासाचे महत्व काय असते हे,
भेटीसाठी प्रतिक्षा करणाऱ्या प्रेमीकांना विचारा
एका मिनीटाचे महत्व काय असते हे
अपघातातून वाचलेल्या व्यक्तीला विचारा
एक मिली सेकंदाचे महत्व काय असते हे
ऑलिपीकमध्ये दुसऱ्या आलेल्या धावपटूला विचारा
त्यामुळे आपण सर्वांनी वेळेला महत्व दिले पाहिजे.

कु स्नेहा शामराव राउत
११ वा वाणिज्य

---

## ✻ जीत ✻

है तेरी यादो मे चाहत का परवान रे
है तेरी....
तु जीत के दिखॉं दे , हर लम्हे को ठूकरादे
बस एक जीत हासील करके जिंदगी बना ले
तेरी हो जीत हो, हर दुनिया खुश हो
हर बात तुझको मंजील तक ले जाइगी
हार हो या जीत हो मंजील को हासीलकर
चाह के भी जींदगी उससे ही बनेगी
तुम्ही तो वो खुश–किस्मत है जिससे
दुसरी दुनिया सजेंगी
प्यार से ही दुनियॉं जीती नही जा सकती
उसमे ही तो हर सपनो की जरुरत होती है
सपनो के पिदे दौडकर जिंदगी बन जाएगी
हर हार मे बार–बार सच्चाई की जीत हो.

कु रुपाली तायडे
बी.ए.भाग– ३

## * नगर का सेवक *

का आहे आज अशी परिस्थिती
जीथे पूर्ण होत नाहीत गारीबांच्या मागण्या
मतदान देऊन काय फायदा, जीथे मिळत नाही लोकशाहीचा खरा कायदा
का नगरात अर्धवट पडले आहेत हे रोड
काय भ्रष्टाचारासाठी कमी पडते रोख
अरे एक वोट गरीबांचा फायदा
त्यातही तुम्ही करता शहाणपणा मोठा
अरे का करता आपण आपल्याशी गद्दारी
मेल्यावर ही मिळणार नाही जाळायला लाकडी
का दोन महिने बांधलेले रोड फुटतात
काय त्यावर पाणी टाकायला मजूर कमी पडतात
का मिळत नाही न्याय कारण आजही सांगते स्पष्टपणे
की आजही चालू आहे भ्रष्टाचार....

कु रुपाली तायडे
बी.ए.भाग– ३

---

## * काय सांगु तु माझ्यासाठी काय होता ? *

काय सांगू तू माझ्यासाठी काय होता? मला मिळालेला प्रेम
काय सांगू तू माझ्यासाठी काय होता? मला मिळालेली सात जन्माची साथ
काय सांगू तू माझ्यासाठी काय होता? माझी जगण्यांची चाहुल
काय सांगू तू माझ्यासाठी काय होता? मला पडलेलं स्वप्न
काय सांगू तू माझ्यासाठी काय होता? माझ्या आयुष्यातील प्रत्येक क्षण
काय सांगू तू माझ्यासाठी काय होता? माझा क्षणीक्षणीचा श्वास
काय सांगू तू माझ्यासाठी काय होता? माझ्या आयुष्यातील आनंदातील क्षण

कु दिक्षा निरंजन भालेराव
बी.कॉम.भाग– १



Scanned with OKEN Scanner

## ✻ का? कोणासाठी ✻

का? कोणावर विश्वास ठेवावा
विश्वास तोडण्यासाठी
का?कोणावर स्वत: पेक्षा प्रेम करावं
धोका मिळण्यासाठी
का?कोणाचा त्रास सहन करायचा
त्याच्यावर प्रेम करतो म्हणून
का?कोणासाठी रडायचं
तो सोडून गेला म्हणून
''कितीही कोणासाठी काही केले तरी कोणीच कोणासाठी मरत नाही''

कु दिक्षा निरंजन भालेराव
बी.कॉम.भाग—१

---

## ✻ मराठी मुलगी ✻

कॉलेजमध्ये अनेक संदर मुली असतात
पण जी गोड लागते
ती मराठी मुलगी असते....
कॉलेजमध्ये मुली जिन्स घालून येतात
पण जी जिन्स बरोबर पायात पैजन घालते
ती मराठी मुलगी असते...
कॉलेजमध्ये अनेक मुली असतात
पण कुणी वात्रटपणा केल्यावर जी कानाखाली वाजवते
ती मराठी मुलगी असते...
प्रेम सर्व करतात पण आयुष्यभर
जी प्रेमाने साथ देते, ती मराठी मुलगी असते...

कु मयुरी वसंतराव खोडके
बी.कॉम.भाग— १

---

## ✻ गुजरे हुए पल ✻

कुछ सालो बाद ये वक्त ये पल बहुत याद आयेगे
जब हमस ब दोस्त मंजील पर पहुच जायेंगे
अकेले होगे जब भी, वो साथ साथ गुजरे हुए लम्हे याद आयेगे
पैसा तो बहुत होगा लेकीन, खर्च करने के लिए लम्हे कम पडजायेंगे
एक कप चाय दोस्त की याद दिलाएगी
यही सोचते सोचते सारी उम्र ही निकल जायेगी

कु मयुरी वसंतराव खोडके
बी.कॉम.भाग— १



Scanned with OKEN Scanner

# * मराठी भाषेचे जिवनातील स्थान *

आपल्या प्रत्येकाचे अस्तीत्वच मुळी आपण जिवनात घेत असलेल्या अनुभवावर अवलंबून आहे. 'जिवन म्हणजे अनुभव' अशी जिवनाची साधी व सुटसुटीत व्याख्या आपणांस करता येईल. आपल्या प्रत्येकाच्या जीवनामध्ये अनुभवाना अनन्यसाधारण महत्व आहे याचा विसर आपणास कधीच पडता कामा नये. जीवनामध्ये घेतलेले अनुभव आपण जतन करून ठेवू शकतो. अनुभवाची देवाणघेवाण करु शकतो. या अनुभवाच्या बळावरच आपण पिढीच्या खांद्यावर उभे राहून सारे आसमंत न्याहाळू शकतो. हे सारे अनुभव जतन करण्यांचे साधन, विचार व्यक्त करण्यांचे साधण म्हणजेच भाषा होय. जर आपल्याला भाषा आली नसती. मानवाला जी नेत्रदिपक प्रगती साधता आली ती केवळ भाषेमुळे! भाषेचा जर अभाव असता तर मानवेत्तर प्राणी आपला विकास साधु शकला नसता. ध्वनी काय प्राण्यानाही तोंडातून स्वरयंत्राच्या मदतीने काढता येतात पण या ध्वनीना अर्थ लावून संकेत निर्माण करणे फक्त मानवाला बुध्दीमुळे जमले. म्हणून मानसाला भाषा बोलता आली नसती तर त्याचीही गत अन्य प्राण्यासारखी केवीलवाणी झाली असती.

आवाजांना आणि ध्वनीनाही एक प्रकारची भाषा असते ध्वनीनाही अर्थ असतात. पशुपक्षी, लहान बाळाचा रडण्याचा आवाज, शिट्टीचा आवाज स्पष्ट करीत असते. पण या आवाजाला, ध्वनीला खुप मर्यादा असतात.

आवाजानंतर प्रगत झाली ती शब्दाची भाषा. भाषा हा संस्कृत भाषेतील मुळ धातू भाष या शब्दापासून तयार झाला. त्याचा अर्थ बोलणे. मग माणूस बोलतो म्हणजे नेमके काय करतो. स्वरयंत्राच्या मदतीने व तोंडाच्या मदतीने विविध प्रकारचे आवाज काढतो. व या आवाजाना वेगवेगळे अर्थ चिकटले असतात हे वेगवेगळे अर्थ लावण्यांची बुध्दी माणसाच्या ठायी असल्याकारणाने भाषा विकसित झाली.

मानवी जीवनाचे महत्वाचे अंग म्हणजे मानवा–मानवाचा परस्पर संबंध होय. व मानवी जीवनाचे दुसरे महत्वाचे अंग म्हणजे आर्थिक, राजकिय, दैनंदिन व्यवहार म्हणूनच सकाळी उठल्या पासून ते रात्री झोपेपर्यंत आपण मातृभाषेचाच वापर करतो म्हणूनच आपल्याला स्वप्न सुध्दा मातृभाषेतूनच पडतात असे कधीही होत नाही की, मातृभाषा मराठी आहे. आणि स्वप्न गुजराती भाषेत हिन्दी, इंग्रजी, भाषेत पडतात. असं कधीच होत नाही.म्हणूनच मराठी भाषा लोकप्रिय आहे. कारण दैनंदिन जीवन जगत असतांना सर्व कार्य मातृभाषेमुळेच पार पडतात.

प्रा.एस.बी.चव्हाण

---

# कॅशलेस व्यवहार

८ नोव्हेंबर २०१६ च्या आधीपर्यंत देशातील चलन व्यवहारात सर्वाधिक वापरल्या जाणा–या ५०० व १००० च्या नोटा अचानक बंद झाल्यानंतर देशात चलन तुटवडा निर्माण झाला. ही परिस्थिती हाताबाहेर जावू लागल्याने केंद्र सरकारने आता रोखविरहीत व्यवहार अर्थात कॅशलेस व्यवहार करण्यासाठी प्रोत्साहन देउ केले आहे. खरं तर कॅशलेस व्यवहार देशाला नविन नाही?तरीही आजपर्यंत दोन टक्के व्यवहार अशा माध्यमातून होत होते. आता परिस्थितीची गरज म्हणून म्हणा किंवा उशिरा सूचलेले शहाणपण म्हणून रोखरहित व्यवहारांना प्राधान्य दिले जात आहे. यामध्ये डेबीट.केडीट कार्डचा वापर, नेट बँकींग, पेटीएम व फीचार्ज यासारखे ॲप या माध्यमांचा समावेश आहे. परंतू, तरीही अशा व्यवहाराबाबत पुरेशी माहिती नसलेले किंवा त्याबाबत काहीशे सांशक असलेले लोक ॲपद्वारे व्यवहार करण्यास धजावत नाही. अशा मंडळींना थर्ड पार्टी अर्थात त्रयस्थ ॲपमार्फत व्यवहार करण्याची भीती वाटत असेल तर विविध बँकांचे ॲप त्यांच्या सेवेसाठी तयार आहेत.

कॅशलेस व्यवहारासाठी मार्ग किंवा पध्दती :

१. स्टेट बॅंक बडी :

भारतीय स्टेट बॅंकेचे श्बडीश हे ॲप १३ भाषांमधून हाताळता येते. या ॲपमध्ये खरेदी, रिचार्ज, बिलभरणा अशा सुविधांसोबतच आपल्या संपर्काच्या खात्यावर पैसे पाठविण्याचीही सुविधा देण्यात आली आहे. याखेरीज विविध हप्त्यांच्या भरण्याची मुदत येताच हे ॲप वापरकर्त्याला सतर्क करते. विशेष म्हणजे, हे ॲप बॅंकेशी जोडलेले असले तरीही खातेदारांच्या बॅंक खात्याला जोडले जात नाही. त्यामुळे ग्राहक आपल्या खात्यातून ठराविक रक्कम ॲपमध्ये जमा करून ग्राहक आपले व्यवहार पूर्ण करु शकतात.



Scanned with OKEN Scanner

२. एचडीएफसी पे--झॅप :

वापरकर्त्यांना ऑनलाईन बिल भरणा, मोबाईल, डीटीएच रिचार्ज, एम--व्हिसा पेमेंट, प्रवासी तिकीटे, सिनेमा तिकीटे यांची खरेदी करण्याची सुविधा या ॲपमधून मिळते. ॲप डाउनलोड केल्यानंतर प्रत्येक व्यवहाराच्या वेळेस वापरकर्त्याला केवळ एका क्लिकवर वरील सर्व सुविधांचा वापर करता येईल. विशेष म्हणजे, हे ॲप अन्य बँकांचे खातेदारही वापरु शकतात.

३. आयसीआयसीआयचे पॉकेटस् :

कोणत्याही बँकेच्या खातेदाराला वापरता येईल असे हे ॲप खरेदी, रिचार्ज, बिल भरणा, पैसे पाठविणे इत्यादी सुविधा देते. या ॲपचे वैशिष्टय म्हणजे, पॉकेटस् सोबत वापरकर्त्याला मोफत व्हर्च्युअल व्हिसा कार्ड मिळते. ज्याचा वापर कोणत्याही ठिकाणी ऑनलाईन शॉपिंगसाठी करता येतो.

४. पेटीएम :

पेटीएम हे एक मोबाईल वॉलेट आहे. मोबाईल वॉलेट एक व्हर्च्युअल आभासी प्रकारचे पैशांचे पाकीट आहे. आपल्याच पैशांनी, पण प्रत्यक्षात नोटा किंवा नाणी न वापरता खरेदी करण्यासाठीचे ते एक व्यासपीठ आहे.

सर्वप्रथम आपणांस एखाद्या मोबाईल वॉलेटवर आपल्या बँक खात्यातून त्या आभासी खात्यात काही पैसे वर्ग करावे लागतात. मग त्याच मोबाईल वॉलेटवर नोंदणीकृत व्यावसायिकाकडे आपण ती रक्कम खर्च करु शकतो. सर्व प्रकारची देयके भरण्यासाठी, मोबाईल रिचार्ज, डीटीएच रिचार्ज या सुविधा पेटीएम ॲपमध्ये उपलब्ध आहेत. या ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन शॉपिंग करणे, टॅक्सी बुक करणे, पानवाला, चहावाला यांचे बिल देणे तसेच एकमेकांना पैसे हस्तांतरीत करणे असे व्यवहार करता येतात.

५. फ्रिचार्ज :

पेटीएम प्रमाणे काम करणारे हे एक ॲप आहे. या ॲपच्या माध्यमातून आपण देयके भरण्यापासून टॅक्सी वाल्यास पैसे देईपर्यंतच्या सुविधांचा फायदा घेऊ शकतो. या ॲपच्या माध्यमातून आपण आपल्या व्हॉटस्ॲप कॉन्टॅक्टमधील लोकांना पैसे पाठवू शकतो व त्यांच्याकडील पैसे घेऊपण शकतो.

६. मोबिक्वीक :

दुकानामधील खरेदी, रोकडरहित करण्याबरोबरच हया खरेदीतील काही रोकड परतावा म्हणून देण्यासाठी हे ॲप लोकप्रिय आहे. या ॲपच्या माध्यमातून प्रवासासाठी उपयुक्त माहिती व तिकीटाचे दर इत्यादी माहिती मिळू शकते. तसेच या ॲपचा आयआरसीटीसी सोबत सहकार्य करार असल्याने या माध्यमातून रेल्वे आरक्षण करणे अधिक जलद झाले आहे.

७. डेबिट, क्रेडिट कार्ड / स्वाईप कार्ड :

बाजारात चलनी नोटांचा तुटवडा असल्यामुळे व्यावसायिकांच्या दैनंदिन उलाढालीवर मर्यादा आल्या आहेत. स्वाईप कार्डची मागणी प्रचंड वाढली आहे. या मशिनसाठी प्रत्येक व्यवहाराला कार्डाच्या प्रकारानुसार काही टक्के रक्कम व्यावसायिकाला आकारली जाते. त्यानंतर झालेल्या व्यवहाराची एकत्रित रक्कम व्यावसायिकांच्या बँक खात्यात जमा केली जाते. यासाठी ग्राहकाकडे डेबिट, क्रेडिट कार्ड असणे आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

८. आयएमपीस :

आयएमपीस म्हणजे आपल्या मोबाईल फोनद्वारे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने दोन बँकामध्ये पैसे पाठविण्याची तात्काळ सेवा होय. यासाठी व्यावसायिकाचे या सेवा देणा—या बँकेमध्ये खाते असावे लागते. आयएमपीएससाठी खात्याशी जोडलेला मोबाईल कमांक त्याच्याशी जोडलेले मोबाईल मनी ट्रान्सफर आयडेंटीफिचर किंवा बँकेच्या शाखेचा आएफएससी क्रमांक व खाते क्रमांक यापैकी एकाचा वापर करुन ग्राहक आपले बिल चुकते करु शकतो. यामध्ये संबधितांच्या खात्यात तात्काळ पैसे जमा होतात.

९. युपीआय : (युनिफाईड पेमेंट इंटरफेस)

युपीआय म्हणजे पैशाच्या हस्तांतरणासाठी असलेला ई—मेल आयडी. त्याच्या आधारे आपण बिल भरु शकतो, दुस—याच्या खात्यावर पैसे पाठवू शकतो. सद्या ऑनलाईन पेमेंट करण्यासाठी ग्राहकाला खाते क्रमांक, खात्याचा प्रकार, बँकेचे नांव, आयएफएससी कोड, इत्यादी माहिती असावी लागते. ही सगळी माहिती भरल्यानंतर १२ ते २४ तासानंतर नविन खातेदाराला (बेनिफिशीअरी) ऑनलाईन पेमेंट करता येते.

याशिवाय एनईएफटी, आरटीजीएस हे कोणत्याही बँकेचे खातेदार असणा—या व्यक्तीला कोणालाही पैसे पाठविण्यासाठी वापरता येतात.

१०. बिग बास्केट :

बिग बास्केट हे भाजीपाल्यासोबत किराणा मालाच्या खरेदीसाठी उपयुक्त ॲप आहे. भारतातील प्रमुख शहरांमध्ये कार्यान्वित असलेले हे ॲप महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर या शहरांत सूरु करण्यात आले आहे. ऑर्डर केलेल्या वस्तू ९० मिनीटांच्या आत आपल्या दारात पोहोचविण्याची हमी बिग बास्केट देते.

११. नेचर बास्केट :

बिग बास्केट प्रमाणेच गोदरेज कंपनीचे नेचर बासकेट हे ॲप भाजीपाला, फळे, सौंदर्यप्रसाधने व किराणा माल खरेदी करण्यासाठी उपयुक्त आहे. या ॲपवरुन खरेदी करणा—यांसाठी कॅशबॅक तसेच अन्य सवलतीही जाहिर करण्यात येतात. भारतात १९० शहरांमध्ये नेचर बास्केट ची सेवा कार्यरत आहे.

मोबाईल बँकींगच्या सुरक्षेसाठी :

१. आपल्या बँक खात्यासंदर्भातील कोणतीही माहिती मोबाईलमध्ये सेव्ह करु नये

२. तुम्ही बँकींग ॲप वापरत असल्यास त्याचे युजर नेम आणि पासवर्ड मोबाईलमध्ये सेव्ह करु नका.

३. पब्लीक वाय—फायचा वापर बँकींगसाठी टाळावा.

४. खात्यासंदर्भातील सूचना टेक्स्ट मेसेजद्वारे पाठवू नये.

प्रा. डी. बी. जाधव
श्री व. ना अ. ना.
महाविद्यालय, मंगरुळपीर



Scanned with OKEN Scanner

# * सहकारातून समृध्दीकडे *

अलिकडे सहकार क्षेत्र फार बदनाम होत असल्याचे आपणांस पाहावयास मिळत आहे. वर्तमानपत्रे, टी.व्ही चॅनल वर 'सहकारातून स्वाहाकार' या संबंधीच्या बातम्या जनसामान्यापर्यंत पोहचत असल्याने लोकांचा सहकारावरील विश्वास कमी होत आहे आणि यामुळे सहकार क्षेत्राची अधोगती होऊ लागली. याचे एकमेव कारण म्हणजे सहकार क्षेत्रात होत असलेला भ्रष्टाचार आणि राजकारण होय.

राजकारण आणि भ्रष्टाचारामुळे हल्ली सहकारी संस्था पोखरुन निघत आहेत. ज्या हेतूने या सहकारी संस्था स्थापन केल्या जात आहेत तो हेतू बाजूला सारुन भ्रष्टाचाराचे हिरवेगार कुरण म्हणून यात राजकारणी चरत आहेत. आणि समाजाला वेशीला टांगत आहेत. म्हणूनच देशातील दारीद्रयाचे प्रमाणे वाढत आहे. ग्रामिण भागाचा विकास खुंटत चालला आहे. त्यातल्या त्यात दिवसेदिवस देशातील बेरोजगारांची संख्या वाढत असल्याने देशाचा आर्थिक विकास मंदावला आहे.

तेव्हा या देशाचा आपणांस खऱ्या अर्थाने आर्थिक विकास घडवून आणायचा असेल तर सहकार क्षेत्रात होणार (राजकारण आणि भ्रष्टाचार नष्ट करावा लागेल) राजकारणाला आणि भ्रष्टाचाराला आळा बसला की मग आपोआपच सहकार क्षेत्रातून सामान्य माणसाला विकासाची किरणे दिसू लागतील, लोकांना सहकारावरील विश्वास वाढेल. अनेक क्षेत्रात सहकारी संस्था निर्माण होतील देशात औद्योगिकीकरणास चालना मिळेल, त्यामुळे देशाचा आर्थिक विकास होईल इतके सामर्थ्य या सहकारात आहे.

सहकाराचे सामर्थ्य अनेक संतानी 'विना सहकार नही उध्दार!! 'एकमेका सहाय्य करु! अवघे धरु सुपंथ!! एकासाठी सर्व! सर्वासाठी एक!! अशा म्हणीमधून अधोरेखित केले आहे. त्यामुळे एकमेकांच्या सहकार्याने काम केल्याने मानवाचा, समाजाचा, आणि राष्ट्राचा विकास होतो. म्हणून राष्ट्र विकासाला आज खऱ्या अर्थाने सहकाराची गरज आहे. सध्या देशाच्या बिकट आर्थिक स्थितीमुळे देशाचा आर्थिक विकास, वृध्दी दर घटत आहे. तेव्हाआपल्याला यावर मात करण्यांसाठी सहकाराचा आधार घ्यावा लागेल. तरच भारत समृध्द होईल.

इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, डेन्मार्क, स्वीडन या सारख्या अनेक देशांच्या विकासात सहकाराचे योगदान नाकरता येत नाही. त्याला आपला भारत देश ही अपवाद नाही. स्वातंत्र्यापूर्वी देशातील शेती व्यवसायाला संजिवनी देण्यांसाठी इंग्लंडच्या धर्तीवर भारतात शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेल्या भांडवलाची गरज पूर्ण करता येण्यासाठी आणि भारतातील शेती हा धंदा सुरळीत चालण्यासाठी शेतीला पैसा पुरवठा करणारी यंत्रणा निर्माण झाली पाहिजे या हेतूने भारतात सन १९०४ ला सहकारी चळवळीचा आरंभ सहकारी पतपुरवठा संस्था स्थापनेच्या कायद्यातून झाला त्यानंतर सन १९१२ मध्ये भारतात सहकारातून विविध गरजांची पूर्तता करता येते या जाणिवेतून सहकारचा दुसरा व्यापक स्वरुपाचा सहकार कायदा पास करण्यांत आला. त्यामुळे खऱ्या अर्थाने देशात विविध क्षेत्रात सहकारी संस्था स्थापनेस चालना मिळाली आणि या विकसनशील देशाला सहकारातून विकासाची खरी चाहूल लागली.

दुग्धव्यवसाय, बँकिंग, प्रक्रिया, सेवा या सारख्या विविध क्षेत्रात सहकारी संस्थांची निर्मीती झाली. त्यामुळे आज देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ३५ टक्के लोकांना सहकारातून रोजगार मिळाला. यापुढेही सहकार क्षेत्रातून कोटयावधी लोकांसाठी रोजगार निर्मिती होईल आणि भारताचा आर्थिक विकासाचा वृध्दी दर वाढेल.

आज निश्चीलीकरण, जीएसटी, गुंतवणूकीचा अभाव, औद्योगिकीकरणात घट या सारख्या ज्वलंत समस्यामुळे देशाचा आर्थिक विकास मंदावला. तेव्हा देशाची विस्कटलेली ही आर्थिक घडी ठिक करण्यासाठी सहकार हा एकमेव रामबाण उपाय आहे. त्यादृष्टीने सरकारने बचत गटाप्रमाणे देशात सहकारी संस्था निर्मितीस चालना दिली पाहिजे सहकार क्षेत्रातील राजकारण आणि भ्रष्टाचार नाहिसा करुन देशातील जनतेत सहकार क्षेत्राची जाणीव जागृती होण्यांसाठी शासनाने पून्हा एकदा पुढाकार घेतला तर सहकारातून देशाचा विकास होईल आणि संतांनी सहकाराची महत्ती ज्या म्हणीमधून व्यक्त केली त्यांचा साक्षात्कार होऊन भारत एक समृध्द राष्ट्र होईल.

प्रा.विनोद दौलतराव कोवे
क.म.वि शिक्षक सहकार



Scanned with OKEN Scanner

# * भारत 'स्मार्ट' च्या दिशेने *

भारतीय अर्थव्यवस्था ही सातत्याने विकास पावत आहे. तीचे जागतिक स्तरावर दणदणीत स्वागत होत आहे. गेल्या काही वर्षामध्ये स्मार्ट जीवन कसे जगू यावर प्रत्येकाच्या कल्पनेचा भर राहिला आहे. वाढती लोकसंख्या आणि झपाटयाने होणारे नागरीकरण यामुळे ग्रामीण भागातून लोकांचा मोठया प्रमाणावर शहरी भागात स्थलांतरीत करणे भाग पडले आहे.

सद्या भारतात शहरे व गावांमध्ये ४२० दशलक्ष लोक विविध भागांमध्ये राहतात. पण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. अर्ध्या जनतेमध्ये पाणी व आरोग्याच्या बाबतीत या योजना कमी पडत आहे. भारतातील लोकसंख्या २०३१ पर्यंत ६०० दशलक्ष पर्यंत वाऐल. या लोकसंख्येला धरुन योजना राबविणे सर्वात महत्वाचे आहे.

भारतीय आर्थिक विकासाचे नेतृत्व शहरेच करतात. ही गोष्ट आपल्याला शहरांमध्ये स्टेट ऑफ द आर्ट पायाभूत सुविधा आणि सेवा व वितरण यंत्रणेची गरज अधोरेखित करते. स्मार्ट सिटीच्या मोहिमेत इतर गोष्टींबरोबर स्वच्छ पाण्याचा पूरेसा पूरवठा, स्वच्छता, घनकच—याचे व्यवस्थापन, कार्यक्षम शहरी गतीशिलता, आणि सार्वजनिक परिवहन व्यवस्था, माहिती तंत्रज्ञानाचे मजबूत जाळे, गरीबांसाठी परवडणारी घरे या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे.

स्मार्ट शहरे :

या वर्षीच्या अंदाजपत्रकात पंतप्रधानांनी भारताला आमुलाग्र बदलवण्याची एक मोठी घोषणा केली. ती म्हणजे १०० स्मार्ट सिटी उभारण्याची. विकासाची गंगा मोठया लोकसंख्यांपर्यंत पोहोचत असल्याने ग्रामीण भागातून शहरांकडे जाणा—यांची संख्या वाढतच चालली आहे. त्यामुळे सध्याच्या महानगरांच्या जवळच्या परिसरांना आणि मध्यम लोकसंख्येच्या शहरांना स्मार्ट शहरांमध्ये रुपांतरित केले जाईल या शहरांमध्ये सर्व प्रश्नांवर स्मार्ट उत्तरे असतील. ती सुविधांच्या माध्यमातून. स्मार्ट शहरे याचा अर्थ जिथे कुठल्याही पायाभूत सुविधांची कमतरता असणार नाही असे स्वच्छ, सुंदर शहर त्यात शाश्वत विकासाला प्राधान्य असेल. प्रत्येक कामासाठी स्मार्ट सुविधा दिल्या जातील. एका स्मार्ट शहराच्या संरचेनत पूरेसा पाणीपूरवठा, वीज, कचरा व्यवस्थापन व स्वच्छता, सक्षम शहरे, गतीशिलता व सार्वजनिक परिवहन, गरीबांसाठी किफायती घरे, सक्षम आयटी कनेक्टीव्हिटी व डिजीटलायजेशन, ई—प्रशासन व नागरिकांची भागीदारी, पर्यावरण संतूलन, आरोग्य विषयक सुविधा, शिक्षणाच्या सोयी, मुले, महिला व वृध्द नागरीकांची सुरक्षा, स्मार्ट पार्कींग, वाहतूक कोंडीचे व्यवस्थापन, व्यापार सेवा केंद्रे, अपारंपारिक उर्जेचा विकास, विजेचा कार्यक्षम वापर, स्मार्ट वीज मीटर, पाण्यावर १०० टक्के प्रक्रिया, कच—यापासून उर्जा व इंधन, इलेक्ट्रीक सेवा पूरवठा, सार्वजनिक तक्रार व सूचना निवारण, सीसीटीव्ही देखरेख इत्यादी घटकांचा समावेश असेल. या स्मार्ट सिटीमुळे लोकांचा जीवनमानाचा दर्जा उंचावरणार, उपलब्ध मनुष्यबळानुसार येथे उद्योजकांसाठी गुंतवणूक करण्यात येईल. लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील, वाहतूकीच्या व दळणवळणाची साधने विकसीत होतील. शहरातील ९५ टक्के रहिवासी परिसराजवळच शाळा, उद्याने असतील. चोवीस तास पिण्याचे स्वच्छ पाणी आणि वीज उपलब्ध असेल. १०० टक्के घरांना इंटरनेट, वाय—फाय कनेक्टीव्हिटी असेल, स्मार्ट शहरांमध्ये १५ टक्के भाग शैक्षणिक संस्थांसाठी राखीव असेल.

स्मार्ट सिटी तंत्रज्ञानाकडे प्रवास :

स्मार्ट सिटीची कल्पना मुलतः नागरीकांशी अधिक परिणामकारक आणि सक्रिय पध्दतीने संवाद साधणे, नागरी सेवांचा दर्जा व कामगिरी वाढविणे, डिजीटल तंत्र वापरणारी नागरी व्यवस्था यांच्याशी निगडीत आहे. तिच्या व्यापक क्षेत्रामध्ये परिवहन आणि वाहतूक व्यवस्था, उर्जा व आरोग्य सेवा आणि कचरा व्यवस्थापन यावर लक्ष देण्याचा समावेश आहे.



Scanned with OKEN Scanner

आपण २१ व्या शतकात वावरत आहोत. पण आज जो कल आहे, तो शहराकडे कारण भारतातील २०११ च्या जनगणनेनुसार ३१ टक्के लोकसंख्या ही शहरांमध्ये राहते. शहर हे विकासाचे माध्यम व्हायला पाहिजे. चौफेर विकास व्हायला पाहिजे. सुंदर इमारतील, सुंदर रस्ते, सुंदर मॉल्स असून चालत नाहीत. गरीब आणि श्रीमंत यामध्ये मोठया प्रमाणात दरी निर्माण व्हायला नको. त्यासाठी वरील बाबींवर लक्ष देणे अपेक्षीत आहे.

जगामध्ये जर विचार केला तर भारत हा विश्वात दुस—या क्रमांकाचा लोकसंख्या असलेला देश असून क्षेत्रफळाने ७ व्या क्रमांकावर आहे. पण स्मार्ट शहरामुळे भारताचे भाग्य पलटू शकते. कारण त्या शहराजवळील खेडयांच्या, वाडयांचा व वस्तीचा मोठया प्रमाणावर विकास होईल यामुळे रोजगार वाढीस चालना मिळेल.

आव्हाने आणि परिणाम :

सद्याच्या भारतीय शहरी व्यवस्थेचे वैशिष्टय म्हणजे त्यात ब्रिटीश काळात वाढलेल्या मुंबई, कलकत्ता आणि चेन्नई व दिल्ली या मोठया शहरांसह ७९३५ शहरे आणि नगरे यांचा समावेश होतो. त्यापाठोपाठ बंगळूरू, हैद्राबाद, अहमदाबाद आणि पुणे अशा दुस—या कमांकाच्या शहरांचा समावेश होतो. या आठ शहरांची एकमेकांवरील अवलंबिता आणि जोडणी व त्या बरोबरच स्थानिक रुपे व शहरी क्षेत्रे यांच्यात भारताला जागतिक आर्थिक महासत्ता बनण्याची क्षमता आहे. पण मोठया प्रमाणावर आव्हाने असल्यामुळे ही शहरे कदाचित हे करु शकणार नाहीत. त्यामुळे नागरी विकास कार्यक्रम महत्वाची भूमिका पार पाडू शकेल. विभागीय असमानता शहरी—ग्रामीण भेद आणि शहरा—शहरांमधील तफावत हे भारताच्या शहरी रुपांतर आणि आर्थिक विकासातील अडथळे आहेत. सध्याच्या केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी आणि अमृत—शहरी रुपांतरण आणि पूनरुत्थानासाठी अटल मोहिमेअंतर्गत असलेल्या संकल्पना आणि कार्यक्रम यांना सापेक्ष बघितले पाहिजे.

स्मार्ट सिटी मोहिमेची क्षमता आणि त्याच्या अमृत, बरोबरच्या समस्येमुळे व 'हाऊसिंग फॉर ऑल' मुळे फायदे मिळू शकतील. स्मार्ट सिटीज् डिजीटल दरी वाढण्यासाठी नसून शहरामधील दरी शहर—ग्रामीण भेद कमी करण्यासाठी आहेत.

आव्हाने पेलण्यासाठी उपाययोजना (अपेक्षा) :

१. सुंदर शहर करतांना सर्व गोष्टींचा विचार ध्यानात घ्यायचा आहे. लोकसंख्या, नगर, उपनगर, व्यवसाय क्षेत्र, औद्योगिक वसाहत यांना नियोजन करावे लागणार आहे.

२. ई—लर्निंगच्या माध्यमातून सर्व नागरिकांमध्ये कार्यालय ओळख, कामांचा व्याप कमी करण्यासाठी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

३. विविध समस्या सोडविण्यासाठी तक्रार निवारण केंद्र होणे गरजेचे आहे.

४. वाहनांची अस्ताव्यस्तपणा टाळण्यासाठी पार्कींगची व्यवस्था ठिकठिकाणी किंवा व्यापारी क्षेत्राकरिता असावी. सार्वजनिक ठिकाणाकरिता व्यवस्था लावायला पाहिजे.

५. व्यापार, व्यवसाय, औद्योगिक क्षेत्राकरिता व नागरिकांकरिता पूरेसा वीजपूरवठा असायला पाहिजे.

६. दहशतवाद व अन्यायग्रस्तांसाठी सुसज्ज पोलीस दले, गुप्तहेर आणि केंद्रीय राखीव पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल असायला पाहिजे.

७. सुंदर शहर निर्मितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर विकास मंत्रालय, पालीका, राज्यसरकार यामध्ये समन्वय असणे गरजेचे आहे.



Scanned with OKEN Scanner

८. पार्कींग, चौकात सिग्नल, हायवे रोड, उडडाणपूल, भूयारी मार्ग, रेल्वे व्यवस्थापन, विमान सेवा यांच्याकडे लक्ष असणे.

९. शिक्षण व आरोग्य या सामाजिक घटकांवर अपेक्षित खर्च करावा.

अमलबजावणी /कार्यपध्दती

स्मार्ट सिटीज मिशन कार्यक्रमात सन २०१५–१६ ते २०१९–२० या पाच वर्षाच्या काळात १०० शहरांचा समावेश असेल. याचा कदाचित विस्तार होवू शकेल. जो नागरी विकास विभागास विभागाच्या मुल्यांकनावर अवलंबून असेल त्यामुळे स्मार्ट सिटीच्या संकल्पना आणि कार्यक्रम हे सतत विकसित होत राहील.

स्मार्ट सिटीज मोहिमेची अमलबजावणी पूर्णवेळ विशेष कार्यकारी अधिकारी आणि केंद्र, राज्य सरकारने आणि स्थानिक प्रशासन यांचे नामांकन असलेल्या विशेष उद्देश माध्यमाद्वारा (एस.पि.व्ही)केली जाईल. शहरी स्तरावर एस.पी.व्ही ही कंपनी कायदा २०१३ अंतर्गत मर्यादीत कंपनी असेल. शहरी स्तरावर जिल्हाधिकारी, खासदार, आमदार, महापौर, एस.पी.व्ही चा मुख्य कार्यकारी अधिकारी युवा वर्ग यांचा समावेशी असलेल्या स्मार्ट सिटी सल्लागार मंचाची स्थापना सर्व १०० स्मार्ट शहरामध्ये केली जाईल. ज्यामुळे सल्ला मसलत होतांनाच विविध भागधारकामध्ये सहयोग शक्य होईल. केंद्र सरकार सुरवातील १९४ कोटी रुपयाचे अनुदान देईल. ज्यात राज्य सरकारने समान अनुदान देईल यापुढील अनुदान शहरांच्या कामगीरीवर अवलंबून असेल. या पुढील काळात ही शहरे स्थानिक खादयप्रकार, आरोग्य, शिक्षण, कला, हस्तव्यवसाय, सांस्कृतीक, क्रिडा सामान, लाकडी सामान, होजीयारी विनकाम इत्यादी आधारीत आर्थिक उपक्रमावर आधारीत ब्रँड आणि ओळख मिळवतील, त्यामुळे स्मार्ट सिटी ही केवळ उत्पादने, सक्षम प्रशासन यांचीच स्थाने म्हणून पुढे येणार नाहीत तर उपयोगाची साधने म्हणून पण स्थान मिळवतील.

अटल मिशन फॉर रेज्युव्हेनेशन अँन्ड अर्बन ट्रॉन्सफॉर्मेशन (अमृत) हा आणखी एक महत्वाकांक्षी कार्यक्रम स्मार्ट सिटी मोहिमेला पुरक असेल. स्मार्ट सिटी मोहिम आणि अमृत या दोन्ही कार्यक्रमासाठी एकूण आराखडा अनुक्रमे ४८ हजार कोटी आणि ५० हजार कोटी रुपयाचा आहे. प्रधानमंत्री आवासयोजना हा आणखी एक कार्यक्रम आहे. ज्यामध्ये शहरामधील झोपडीवासी तसेच आर्थिक दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील लोकांना परवडणारी २ कोटी घरे उभारण्यासाठी पुढील ७ वर्षात तब्बल ३ लाख कोटी रुपये खर्च केले जातील. त्यासाठी झोपडपट्टीवासीयांना ही योजना वरदान ठरणार आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार ६५ दक्षलक्ष एवढी संख्या असलेल्या गरीब झोपडपट्टीवासीयांनाही संरक्षीत करण्यांची गरज आहे. प्रशासनाच्या पातळीवर वा अंमलबजावणीच्या पातळीवर या कार्यक्रमांना वेगळे पाहता कामा नये त्यामुळे त्यांचा सर्वसमावेशकतेचा दृष्टीकोण हिरावला जाईल. स्मार्ट सिटी संकल्पनेची सुरुवात ही माहिती व डीजीटल तंत्रज्ञानाचा वापर करुन भ्रष्टाचाराला कमी करण्यांची गरज आणि शहरी भागात सेवांची पुरक आणि कार्यक्षम पोहच या पार्श्वभूमिवर आहे. कार्यक्रमाचे यश भविष्यात लोकांचे आयुष्य बदलविण्यांची क्षमता आणि समाजातील वाढती असमानता कमी करण्यावर जोखली जाईल.

संदर्भ :— योजना मासिक, दैनिक महाराष्ट्र मधील लेख

प्रा.डी.बी.जाधव



Scanned with OKEN Scanner

# VALUE OF TIME AND YOUTH

Importance of time should be understood by man, because 'Time and tide wait for none.' Time is like a bird which flies fast. So, once the time lost, it can not be recalled on any condition. There is a proverb 'make hay while sunshines' When we get an opportunity, we must grab it. Once it is lost, it is lost forever.

Youth is the glorious period in human life. It is the divine phase in one's life. If we work hard when we are young, we shall be happy at the old age. First we do hard labour, then we shall enjoy its fruits. We must not waste our time. Many young people fail to do their duties. When wisdom returns, to those who have fallen an evil way and make a permanent wreck of themselves, at their old age they regret.

'Time is Money', this Prorerb shows the importance and value of time. Time is precious, we must utilize it. There is the importance of every minute and every second in one's life. Ask the value of one second to Russia who lost in the war. Ask the value of one minute to the youth who has survived in an accident. Ask the the value of one day to the labour who toils the whole day. Ask the value of one month to the expected mother nourishing the fetus in her womb. And ask the importance of one year to the student who failed in an examination. Therefore, we must avoid the habit of saying, 'I will do it after same time'. We must change such sort of habits and lead our life as a stroke of good habits. If there is a task before us, we must finish it then and there. If it is postponed, it is postponed for ever. So we must follow the principle 'kal kare so aaj. Aaj kare so abhi'.

This is the age of competition. There is a cut-throat competition in each and every field of life. It we have to keep our existence in this competitive world, we must be the participants of the compaction. And, one who puts time to the best of his use, comes out as the hero in the battle of life. Men who fail to vide over the opportunity are failure in life. We should place ourselves in the future constantly, because time is swift and we have to do a lot within the limited time. A poet rightly says

'The future is your time, and time is fieet
And future is for him who does and dares'.

Therefore we should keep account of each day. every hour and even every minute.

In the journey of life, we meet with two inevitable things i.e.beauty and duty. Beauty is quite related with youth. Sometimes, me may aspire for beauty. But we must remember what Robert forst said

'The woods are lovely dark and deep,
But I have promises to keep
And miles to go before I sleep
And miles to go before I sleep;'

Youth is called the pillar of nation. Whatever we do, we must do for the good of our country. Youth is he who lightens the darkest corner in the world as well as lightens the darkest corner in his own life. 'Laziness is the foe of man. Laziness in the youth will lead to misery and unhappiness in the old age.

We must try to understand the importance of time in youth. To conclude, 'Youth' is life time opportunity, one must equip it, grab it for the better of one's life'.

**Pramod N. Jadhao**
M.A.(Eng) B.Ed.M.Phil.



Scanned with OKEN Scanner

# मॉल संस्कृतीचे किरकोळ व्यापारावर होणारे परिणाम

प्रस्तावना,

भारतीय अर्थव्यवस्था अतिशय वेगाने आर्थिक विकासाकडे वाटचाल करीत आहे. जागतीक बँकेच्या निष्कर्षानुसार २०१९ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था इतर प्रगत देशांना मागे टाकूण अधिक विकास दर नोंदवून महासत्ताक होईल असे म्हटले जाते.

भारतीय अर्थव्यवस्थेत किरकोळ व्यापारासमोर मॉल संस्कृती हा एक नविन किरकोळ व्यापार आलेला आहे. १९५८ मध्ये जगातील पहिले बंद स्वरुपातील मॉल टेक्सासमध्ये 'हारुन डेल मॉल' या नावाने सुरु झाले. भारत देशात प्रथम १९८५ ला मद्रास (चेन्नई) येथे स्पेनसर प्लाझा या नावाने मॉल सुरु करण्यांत आला. मागील दशकापासून मोठया शहरामध्ये व नंतर लहान शहरामध्ये मॉल संस्कृतीने आपला पाया भारतीय अर्थव्यवस्थेत मजबूत करण्यांस सुरुवात केलेली आहे.

मॉल हे आजच्या आधुनिक युगातील मोठे व्यापारी संकुल आहे. या ठिकाणी एकाच छताखाली विविध ब्रँड असलेल्या जिवनावश्यक वस्तूची अनेक किरकोळ दुकाने असून ग्राहकांना वस्तूची विविधता पाहायला मिळते.

मॉल मध्ये जिवनावश्यक व दैनंदिन उपयोगाच्या वस्तू म्हणजेच सुई पासून तर कार पर्यंत तसेच ग्राहकाकरीता हॉटेल, मनोरंजनाचे विविध साधने मॉलमध्ये समाविष्ठ असतात मॉलची संकल्पना विचारवंत झिकमुंड यांनी पुढील शब्दात मांडलेली आहे. ''तो एक अशा प्रकारचा आराखडा आहे. ज्यात केंद्रीत अशा भूपृष्ठाच्या अवतीभोवती दुकानाची रचना केलेली असून त्यात ग्राहक अगदी सहजतेने रमतगमत फिरु शकतील त्याला मॉल असे म्हणतात''.

भारतीय अर्थव्यवस्थेत किरकोळ व्यापार एक महत्व पूर्ण क्षेत्र आहे. कारण देशातील असंख्य लोकांना स्वयंरोजगार व रोजगार उपलब्ध झालेला आहे. परंतू मॉल संस्कृतीचा अतिशय वेगाने विकास व विस्तारामुळे किरकोळ व्यापार क्षेत्र अतिशय प्रभावित होवून त्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येते.

मॉल संस्कृतीचे अनुकूल परिणाम

१) वस्तू निवडीला वाव :–

मॉल मध्ये असणाऱ्या वस्तूची आकर्षक मांडणी करुन प्रत्येक विभागामध्ये वस्तू ठेवलेल्या असतात. त्यामुळे ग्राहक आपल्या पसंतीनुसार वस्तू व सेवा घेऊ शकतो म्हणजे वस्तू व सेवा निवडीला चांगलाच वाव असतो.

२) श्रम, वेळ व पैशाची बचत :–

एकाच छताखाली विविध वस्तू, सेवा, लहान मुलांची खेळणी, करमणूकीचे साधने, हॉटेल्स उपलब्ध असल्यामुळे ग्राहकांना विविध वस्तू व सेवा खरेदीसाठी वेगवेगळया ठिकाणी फिरावे लागत नाही. त्यामुळे ग्राहकांचा वेळ, श्रम व पैशाची बचत होऊन खरेदीचा आनंद घेता येतो.

३) सामाजिक व सांस्कृतीक केंद्र :–

आजच्या आधुनिक मॉलमध्ये मनोरंजन व सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सामाजिक सांस्कृतीक केंद्र असतात. त्यामुळे त्या ठिकाणी कौटुंबीक, सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रम साजरे करुन वस्तू व सेवांच्या खरेदीचा आनंद देखिल उपभोगू शकतात.

४) सहकुटुंब वस्तुची खरेदी :–

मॉल संस्कृतीने कुटुंब व्यवस्थेला आधार यातून सर्व सोयी, सुविधा वस्तू व सेवा उपलब्ध करुन दिल्यामुळे संपूर्ण कुटुंब खरेदीला जाऊन खरेदीचा आनंद घेऊन वस्तू खरेदी करतात त्यामुळे मॉल मधील वस्तूच्या विक्रीला चांगलीच चालना मिळते.



Scanned with OKEN Scanner

५) उच्च दर्जाच्या वस्तू :—

मॉल या संस्कृतीमुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वस्तू व सेवा योग्य व माफक दरामध्ये उपलब्ध होत असल्यामुळे सर्व सामान्य ग्राहक वस्तू व सेवांची खरेदी करीत आहेत. त्यामुळे ग्राहकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास व मॉलमधील वस्तूच्या व सेवांच्या विक्रीत चांगलीच वाढ होत आहे.

<u>मॉल संस्कृतीमुळे किरकोळ व्यापाऱ्यावर होणारे प्रतिकूल परिणाम</u>

१) भांडवल अल्प :—

मॉल संस्कृतीकडे मोठया प्रमाणावर भांडवल असल्यामुळे विविध वस्तू, सेवा, मनोरंजनाची साधने, लहान मुलांकरीता खेळण्यांचे साहित्य उपलब्ध करुन दिल्या जातात. परंतू लहान किरकोळ व्यापाऱ्याकडे भांडवलाचा अभाव असल्यामुळे या सोयी, सुविधा, सेवा व विविध वस्तू उपलब्ध करुन देऊ शकत नाही. त्यामुळे ग्राहकांनी किरकोळ व्यापाऱ्याकडे पाठ फीरलेल दिसून येते.

२) आकर्षक योजनाचा अभाव :—

मॉल संस्कृतीमुळे उत्पादक स्वत: आपले किरकोळ दुकाने मॉल मध्ये लावतात. मॉलमधील विक्रेते जास्त भांडवल असल्यामुळे प्रत्येक वस्तू उत्पादकाकडून मोठया प्रमाणावर खरेदी करतात त्यामुळे ग्राहकांना वस्तूच्या किंमतीमध्ये सुट, विशेष आकर्षक, बक्षीस मोफत वस्तूचे नमुने अशा विविध योजना राबवितात. या विविध आकर्षक योजना किरकोळ किरकोळ व्यापारी राबवू शकत नाही. कारण हे घाउक व्यापाऱ्याकडून कमी प्रमाणात वस्तू खरेदी करतात त्यामुळे ग्राहकांनी किरकोळ व्यापाराला नापसंती होत आहे.

३) वस्तू सजावट व मांडणीचा अभाव :—

मॉल संस्कृतीमध्ये विक्री करण्याकरिता मुबलक प्रमाणातं वस्तू ठेवण्यांसाठी जागा जास्त असते. त्यामुळे ग्राहक प्रत्येक वस्तू स्वत:हात लावून पाहू शकतो. त्याचबरोबर वस्तूची उत्तम मांडणी, सजावट केलेली असते. त्यामुळे ग्राहक आकर्षित होवून वस्तू खरेदी करतो. किरकोळ व्यापारी जागेअभावी या सर्व सोयी व सुविधा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्याकडील ग्राहक वर्ग कमी कमी होत आहे.

४) किरकोळ व्यवसाय बंद होण्यांच्या मार्गावर :—

मॉल संस्कृतीमुळे किरकोळ व्यापारी वर्गाची वस्तू व सेवांची विक्री कमी कमी होत असल्यामुळे नफ्याचे प्रमाणे सुध्दा कमी कमी होत आहे. त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठिण होत आहे. त्यामुळे किरकोळ व्यवसाय बंद होणयाच्या मार्गावर आहेत.

५) मॉल उशिरापर्यंत सुरु :—

मॉल मध्ये येणारा ग्राहक वर्ग हा जास्त प्रमाणात नौकर वर्ग असतो. तो आपले काम पूर्ण झाल्यावर सुट्टी झाल्यानंतर रात्री उशिरापर्यंत वस्तू खरेदी करतात. शनिवार व रविवारला मॉलमध्ये जास्त प्रमाणात ग्राहक वर्ग येतो. परंतू किरकोळ व्यापाऱ्याचे व्यवसाय रात्री उशिरापर्यंत सुरु राहत नाही. त्यामुळे ग्राहक वर्ग येत नसल्यामुळे किरकोळ व्यापाऱ्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

६) बेरोजगारीची समस्या :—

स्वयंरोजगार व रोजगाराचे माध्यम म्हणून किरकोळ व्यापाराकडे बघीतले जाते. कारणे सर्वात जास्त स्वयंरोजगार व रोजगार किरकोळ व्यापार या क्षेत्रापासून उपलब्ध होतात. परंतू मॉल संस्कृतीमुळे किरकोळ व्यापार बंद होण्यांच्या मार्गावर आहेत. तर काही बंद झालेले आहेत. त्यामुळे मॉल संस्कृतीचा प्रतिकूल परिणाम होऊन बेरोजगारीची तीव्र समस्या निर्माण होत आहे.

थोडक्यात

मॉल संस्कृती ही ग्राहक वर्गाला लाभदायक ठरलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा मुळ स्तंभ असलेल ग्राहक राजा यांचा राहणीमानाचा दर्जा उंचाविण्यांचे कार्य मॉल संस्कृती करीत आहे. मॉल संस्कृती ही देशामध्ये सर्वात जास्त रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या किरकोळ व्यापार क्षेत्रावर अत्यंत नकारात्मक परिणाम करुन असलेले रोजगार हिरावून बेकारी निर्माण करण्यांचे कार्य करीत आहे.

संदर्भ :—

१) व्यवसाय संघनेची मुलतत्वे :— लेखक प्रा.एस.एस.कोलते
२) भारतीय अर्थव्यवस्था :— लेखक के.पी.सुंदरम आणि दत्त

प्रा.अरुण नथ्थुजी गजभिये
(वाणिज्य विभाग)



Scanned with OKEN Scanner

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्व व समकालीन दलित्तोध्दाराचे कार्य – एक विवेचन

जाती भेदाची उत्पत्ती :–

प्राचिन काळात, इराण, रोमण आणि भारतीय समाज व्यवस्थत, व्यवसाय आणि सांस्कृतीक भेदातून, वर्ग व्यवस्था व कालांतराने जाती व्यवस्था निर्माण झाली. अनेक सामाजिक स्थित्यंतरातून प्रवास केल्यानंतर सामाजिक व्यवस्था स्थिर होऊ लागली. पूर्व व पश्चिमेकडील जगाने जातीची विभागणी वर्ग आणि गुणवत्तेच्या निकषावर करुन, आपली सामाजिक चौकट निर्माण केली. मात्र आपल्या देशात आर्यांनी (आर्य–अनार्य संघर्षानंतर) दैवि सिध्दातांच्या आधारावर श्रम विभागणी करुन, वर्ण व्यवस्था निर्माण केली. वैदिक काळातील ही चार वर्णाची सामाजिक रचना पुढील काळात आपली लवचिकता हरवून बसली, व्यवसाय 'जात' बनली. ती वंशपरंपरा मरपेरेंच्या जोखडात कायमची बंदिस्त केल्या गेली. याचे भारतीय समाजावर गुंतागुंतीचे दिर्घकालीन अनिष्ट परिणाम घडून आले. 'जात' श्रेष्ठ–कनिष्ठ सामाजिक दर्जा ठरविणारे 'माप' ठरले. हा सामाजिक प्रवास कमी अधिक प्रमाणात स्वांतंत्र पूर्व काळापर्यंत सातत्याने कायम होता. श्रेष्ठ जातीचा मोठेपणा कनिष्ठ जातीनी कायम ठेवला होता. ऐतिहासिक राजकिय स्थित्यंतरामध्ये किंवा मुस्लीम–ब्रिटीशानीही ७०० वर्षाच्या काळात भारतीय समाजात ढवळाढवळ केली नाही. बहुधा त्यांचा हेतू (राजकिय) सिध्द होत असावा.

मानवतावादी विचाराचा उष:काल

अशी जाती व्यवस्थेची मुळे इतिहासात दिसून येतात. तो काळाचा महिना, परंतू युरोपात मानवतावादी स्पर्शाने क्रांती करुन जुलूम दडपून टाकतांना अंर्त–बाह्य आधुनिकतेच्या स्पर्शाने अंधकारमय जळमटे तुच्छ समजून दूर केल्या नंतरही, आम्ही भारतीय ऐतिहासिक कालबाह्य वंश परमपरेच्या श्रेष्ठ–कनिष्ठ वर्तुळात बंदिस्त रहावे. हे देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. आधुनिक विचाराच्या स्पर्शाने मोहित झालेल्यांना, 'स्पृश्य' ही जातीची अवास्तव कल्पना सर्वार्थाने अमान्य होती. हजारो वर्षापासून दु:खाचे वाटेकरी असलेल्या, अन्यायात स्वितपत पडलेल्या 'शुद्र' जातींना भारतीय परंपरा स्विकार्ह नव्हती. विचाराचे स्फुल्लिंग पेटले त्यातून तळपता निखारा ' हक्का' करिता पेटून उठला, त्याचे नांव आहे. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर.

भारतीय शुद्र समजल्या जाणाऱ्या अस्पृश्याना अनेक स्थित्यंतरातून जावे लागले. सुरवातील ४००० वर्ष तरी स्वकियानिच, त्याचा सामाजिक– राजकिय व आर्थिक छळ केल्याचे दिसून येते हा छळ त्यांनी धर्माच्या नावाखाली रुजविला होता. नंतर ७०० वर्षापर्यंत परकियाच्या वर्चस्वाखाली पराभूत मनोवृत्तीत राहूनही श्रेष्ठ म्हणून घेणाऱ्या भारतीयांनी आपल्या अहंमभावात बदल केलेले दिसून येत नाहीत.

सन १९ व २० व्या शतकात अस्पृश्य जातीना मानवतेच्या दृष्टीकोणातून पहातांना, सर्व प्रथम युरोपियन मिशनऱ्यांनी सामाजिक न्याय देण्यांचे कार्य सुरु केले. परिणामी काही भारतीयानाही अस्पृश्य जाती बाबत सहानुभुती वाटू लागली या मध्ये बाबा पद्मजी, ज्योतीबा फुले, विष्णुबुवा ब्रम्हाचारी, भिकोबा दादा चव्हाण, रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे, गोपाळकृष्ण गोखले सयाजीराव गायकवाड, छ. शाहू महाराज, इ सारख्या अनेक समाज सुधारकांनी जातीच्या छत्री खाली अस्पृश्यावर होत असलेल्या अन्यायाला विरोध करुन त्यांच्या उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्न केले.

त्यानंतर आंबेडकर समांतर व (थोडे) पूर्व काळात गोपाळबुवा वलगावकर, शिवराम जानबा कांबळे, विठोबा मून, वि.रा.शिंदे, गणेश आकाजी गवई, सेनु नारायण मेंढे, धनाजी रामचंद्र बिन्हाडे, यांच्या सारख्या महाराष्ट्रातील व देशातील अनेक समाज व अस्पृता निवारण समाज सेवकांनी वर्ण, व जाती व्यवस्थेवर प्रहार करतांना व्यवस्थेतील (अस्पृश्य) रुढ असलेल्या अंधश्रध्दे विरोधात जागृती करतांना, अंधश्रध्देमुळे व्यासनाधिनते मुळे, अनिष्ट प्रथा– परंपरेमुळे, अस्पृश्यांची बुध्दी कुंठीत बनली आहे. त्यामुळेच तुम्ही दातृत्वाच्या शृखलेत अडकले आहात, हे दास्यत्व ही गुलामगिरी, हा बंदीवास तम्ही हजारो वर्षा पासून स्वकर्माने लादून घेतला आहे. तेव्हा आता तरी डोळसपणे जागे व्हा! हक्कासाठी लढण्यासच नव्हे तर मरणासही तत्पर असा, अशा प्रकारचे स्वत्व: जागृत करणारे संदेश देऊन, अस्पृश्य समाजात जागृती घडवून आणण्याचे महत्पूर्ण कार्य केले. डॉ. बाबासाहेबांच्या पूर्वी व समकाळात अस्पृश्य समाजात घडून येत असलेली ही अभिनव अशी क्रांतीच म्हणावी लागेल.

वरील समाजसुधारकांच्या अस्पृश्य निवारण व न्याय हक्क मिळवून देण्यांचा लढा माझ्या मते, सन १८५७ च्या उठावापूर्वी देशात ब्रिटीशांच्या जुलूमा विरोधात झालेले एकाकी उठावा सारखे किंवा सन १८८५ पूर्वी ब्रिटीशांच्या अन्याय धोरण विरोधात, आपल्या न्याय मागण्या मान्य होण्यांसाठी देशात ज्या



Scanned with OKEN Scanner

अनेक राजकीय सामाजिक एकाकी (प्रादेशिक)संघटना स्थापन करुन कार्य केले त्याच प्रमाणे होते. परंतु डॉ. बाबांनी अस्पृश्योध्दाराचे संघटीत व सुसुत्रबध्द कार्य करतांना त्यांच्या कार्याचे मोल सन १८५७ च्या उठावा सारखे (नंतर ब्रिटीशांच्या डोळयात झझंणीत अंजन घातल्या सारखे) किंवा सन १८८५ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून सर्व भारतीयावर होणाऱ्या अन्यायाला संघटीत वाचा फोडण्यांच्या सारखे होते.

वर्षानुवर्षे अन्यायग्रस्त अस्पृश्य जातीना जी अमानवी वागणूक मिळत होती. त्यापासून मुक्ती मिळावी म्हणून, ब्रिटीशकाळात भावी दृष्टीकोणातून जी सुरवात झाली, त्या पार्श्वभूमिवर समाज सुधारकाचे, धर्मसुधारकाचे कार्य मोलाचे आहे.

वरील समाजसुधारकाचे अस्पृश्योध्दराचे कार्य, डॉ. आंबेडकरांनी स्व. अनुभवाने कौशल्यपूर्ण श्रमाने मिळविलेल्या ज्ञानाणे पूर्णत्वास नेले. शालेय जिवना पासूनच बाबासाहेबांना समाजातील वाईट चालीरितीने चटके बसवत होते. उच्च शिक्षण पूर्ण होई पर्यत स्वअनुभवाने त्यांना भारतीय समाज रचनेतील श्रेष्ठ—कनिष्ठ दरी किती भयंकर आहे. हे कळून आले होते. तेव्हा पासून त्यांच्यातील 'गौतम' हळू हळू जागा होत होता. अस्पृश्या वरील अन्याय करित लढा देतांना सर्वप्रथम त्यांनी दलीत चळवळ उभी केली महार, मांग, चांभार अशा अस्पृश्य जातीसह ज्यांना मनुस्मृतीने हक्क नाकारले आहेत. त्यांच्यासह, उच्च वर्गातील मानवतावादी दृष्टीकोण ठेवून कार्य करणाऱ्यांना सोबत घेऊन. डॉ. बाबासाहेब यांनी पददलितांच्या हक्कासाठी न्याय लढा दिला. ज्यांच्या सावलीने विटाळ होतो. ज्यांचे अस्तीत्व उच्च वर्गियांच्या दयेवर होते. अशा लाचार बनलेल्या दलित जातीना निसर्गदत्त हक्क मिसळून देण्यांसाठी ज्यांना माणूस म्हणून जगण्यांची शक्ती देण्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण जीवन वेचले त्या करिता त्यांनी असंख्य प्रयत्न केले, त्या पैकी मानगावची महार परिषद, महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, शैक्षणिक विकासा करिता— बहिस्कृत हितकारणी सभा, अनेक शाळा, महाविद्यालये काढली. त्याच्या हक्क करिता (राजकिय) अनेक संघटना स्थापन केल्या उदा. मंजूर पक्ष, ऑलइंडीया शेडयुल कास्ट फेडरेशन, रिपब्लीकण पक्ष इत्यादी तसेच दलित मध्ये जागृती व्हावी म्हणून मोठे लिखान केले वृत्तपत्रे काढली उदा. मूकनायक, बहिस्कृत, भारत जनता प्रबुध्द भारत इत्यादी.

बाबासाहेबांचा जीवन प्रवासच जणू पद दलितांच्या उध्दारा करिता होता. ज्या शुद्र जातीना हजारो वर्षा पासून समाजिक हक्क माहिती नव्हते फक्त उच्च जातीचा 'हुकुम' माहिती होता, त्यांना व ज्यांनी त्यांच्यावर सत्ता गाजविली अशानही डॉ. बाबासाहेबांनी मानसिकता बदलविण्यांस भाग पाडले.

डॉ. बाबासाहेबांच्या अथक प्रयत्नांची, त्यांच्या बहुमोल कार्याची पावती त्यांना केवळ, त्यानीच भारतीय राज्य घटना पूर्णत्वास नेल्याच्या कार्यावरुन सिध्द होते. त्यांच्या या ऐतिहासिक कार्यामुळे भारतीय समाजातील दोष लोप पावले, ज्यांनी अहमंपणे अन्याय केले होते तेही बाबासाहेबा पुढे नतमस्तक झाले होते. अशा या थोर महात्म्याचे मन शेवटी मात्र खिन्न होते. आपल्या कार्याचे रुढीवादी योग्य मुल्यमापन करत नाहीत (मानवतावाद समजूनही न समजल्या सारखे करतात) हे पाहून त्यांना दु:ख झाले शेवटी त्यांनी कठोर निर्णय घेतला ज्या धर्मात मी जन्म घेतला आहे. त्या धर्मात माझा मृत्यु होणार नाही या व्यथेला त्यांनी, १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी वाट मोकळी करुन दिली. येथेही डॉ. बाबासाहेबांनी हिन्दु धर्माला संकटा, पासून वाचविले.

डॉ. बाबासाहेबांनी समकालीन दलित समाजातील शुद्र जातीची व्यथा समजून घेतली होती. समाजातील दोन टोकांना, त्यांनी जोडण्यांचा यशस्वी प्रयत्न केला. त्या करिता त्यांनी आपले बहुमोल आयुष्य देशाला अर्पण केले दुर्दैवाने भारतीयांना एक 'शाप' आहे. जिवंतपणी व्यक्तीच्या कार्याचे योग्य मुल्यमापन त्यांना करता येत नाही. मात्र कर्तत्ववान व्यक्तींच्या मृत्युनंतर, त्यांच्या कार्याची महती, त्यांना समजते. म्हणूनच आज म्हणावेसे वाटते की, ''डॉ बाबासाहेबांनी जे जिवंतपणी साधले नाही, ते त्यांच्या मृत्यु नंतर साध्य केले''

बबासाहेबांचे जीवन आज एक मानवधर्म एक समग्र विचार बनला आहे.

संदर्भ :— आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास :— प्रा.मंगेश वाघ, प्रा. मंजूळकर

प्रा.चंद्रकांत नानाराव घुगे
इतिहास विभाग प्रमुख



Scanned with OKEN Scanner

# संत तुकारामांच्या साहित्यातील सामाजिकता

महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी आहे महाराष्ट्रामध्ये तेराव्या शतकात अनेक धर्मपंथ उदयास आले. त्यामध्ये प्रामुख्याने महानुभाव पंथ व वारकरी संप्रदाय यापैकी वारकरी संप्रदायाचा मोठयाप्रमाणात विस्तार झाला संत ज्ञानेश्वरांनी अध्यात्मिक लोकशाहीची स्थापना करुन धार्मिकदृष्टया परमार्थत समतेचा पुरस्कार केला त्यातूनच अठरापगड जातीतून संत निर्माण झाले. ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा तात्विक पाया नाथ संप्रदायाद्वारे रचला या वाटचालीमध्ये वारकरी संप्रदायाचा कळस होण्याचे भाग्य ज्या संत तुकारामाला लाभले, त्यांची अभंग गाथा अनेक वैशिष्टयांनी परिपूर्ण आहे. भक्तीविषया बरोबर त्यांचे सामाजिक चिंतन आजही प्रेरणादायी आहे.

संत तुकारामांनी आपल्या अभंग गाथेमधुन भक्तीबरोबरच अनेक विषय हाताळलेले आहेत धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण तसेच शेती व्यवसाय इत्यादीचे संदर्भ तुकारामाच्या गाथेमध्ये येतात. म्हणूनच संत तुकारामाची गाथा म्हणजे अनेंक विषयाचे भांडार आहे. त्यातूनच त्यांची समाजचिंतकाची भूमिका महान तत्ववेत्यासारखी वाटते.

संत तुकारामाच्या जन्मापूर्वी महाराष्ट्रात राजकीय, समाजिक, धार्मिक क्षेत्रात मोठी मरगळ निर्माण झाली होती वेदकाळात स्त्री शुद्रांना असणारे थोडेफार स्वार्तंय ही पुराण काळात पूर्णतः नष्ठ झाले. समाजव्यवस्था पुरोहितांच्या हाती गेली हिन्दू धर्माची वर्णव्यवस्थेची चौकट बळकट झाली. त्या विरुध्द शैव, जैन, बौध्द, नाथपंथी, महानुभाव, वारकरी या संप्रदायांनी बंडही पुकारले परंतू सामाजिकदृष्टया बऱ्याच गोष्टीत समाज अन्याय सहन करीतच होता. त्यामध्ये वारकरी संप्रदायातील संतांनी उपेक्षित लोकांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यांसाठी संघर्ष केला. संत तुकारामाच्या अभंगवाणीमध्ये या सामाजिक दुःस्थितीतचे दर्शन घडते.

" न देखवे डोळा ऐसा हा आकांत! परपीडे चित दुःखी होत!!
काय तुम्ही येथे नसालसे जाले! आम्ही न देखिले पाहिजे हे!!"

संत तुकाराम देवाला सांगतात, मला असे दुःखप्रसंग पाहावत नाहीत दुसऱ्याला पिडा झाली की मला दुःख होते. या जाणिवेने त्यांची सामाजिक तळमळ आहे. समाजामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या भक्कम चौकटी निर्माण झाल्या होत्या. या चौकटीमुळे सामाजिक विषमतेच्या चक्रात अनेक संतांना असे अनुभव आले. संत तुकाराम स्वतःला कुणबी कुळातील शुद्र समजत असत. ती व्यथा त्यांनी मांडली आहे.

"हीन माझी याती! परि स्तुती केली संती!!"

तात्कालीन समाजामध्ये अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झाले होते. त्याकाळात मुलाच्या बापाकडून हुंडा घेत असावेत एवढेच नव्हे तर मुलीचा लिलाव देखिल होत असे. व्रत, नवस, शकुन–अपशकुन, भूत, भविष्य, ईश्वर यावर समाजाचा विश्वास होता. अंधश्रध्दा वाढलेली होती मूळ भक्ती सोडून दांभिक साधूसंतांनी समाजाला फसवण्याचे काम चालवले होते.


"भगवे तरी श्वास सहज वेष त्यांचा! तेथे अनुभवाचा काय पंथ!
वाढवूनी जटा फिरे दाही दिशा! तरी जंबुवेषा सहज स्थिती!!"

धर्मरक्षण करणे आणि सामाजिक नीतीमत्ता राखणे हे संत तुकारामांना महत्वाचे वाटते. धर्माच्या नावाखाली समाजाला लुबाडणाऱ्या, फसवणाऱ्या ढोंगी, मांत्रिकांवर, किर्तनकारांवर, गोसाव्यांवर, भक्तांवर जो प्रचंड प्रहार संत तुकारामांनी केला ते एक कर्मयांगी सज्जनाच्या भूमिकेतूनच! धर्माच्या नावाखाली समाजाचे शोषण होते, ते संत तुकारामांनी जनसामान्यांना समजावून सांगीतले.

"ऐसे कैसे झाले भोंदू! कर्मकरोनी म्हणती साधू!!



Scanned with OKEN Scanner






**अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम.**
**द्वारा संचालित**
**श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि.वाशिम.**

Scanned with OKEN Scanner